RNI. REG. NO. MAHBIL/2023/86118
लोकरक्षणाय
लोकशाहीच्या संरक्षणार्थ
सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ

दैनिक
# लोकरक्षणाय

प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, नवी मुंबई, पुणे, रायगड, नाशिक, सातारा, कोल्हापूर

वर्ष ०३ | अंक २३६ | पृष्ठे ०८ | रू. २/-

www.lokrakshanay.com | epaper.lokrakshanay.com | ठाणे, दिनांक शनिवार, २० डिसेंबर २०२५

dainiklokrakshanay@gmail.com | +91 97023 86118 | 022 - 6971 1890



पालघर जिल्ह्यातील वीटभट्टीवरील स्थलांतरित लाभार्थ्यांची आरोग्य तपासणी पान ३ वर

विशेष लेख

संत गाडगे महाराज यांचे सामाजिक कार्य पान ४ वर

**सुविचार**

"व्यस्त असणे म्हणजे नेहमी कामात असणे असे होत नाही."

- थॉमस एडिसन



जुन्नरच्या कन्येची 'गगनभरारी'!; 'समृद्धी'ची भारतीय वायुदलात फ्लाईंग ऑफिसर पदावर... पान ८ वर

विशेष उपक्रम

वाचकांसाठी खास उपक्रम - ध्यास+ (ध्यास सकारात्मकतेचा) पान ५ वर

ध्यास सकारात्मकतेचा

# भगवान ऋषभदेवांचे विचार भारताच्या प्राचीन व महान संस्कृतीचे प्रतीक – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## 'ऋषभयान-२' वैश्विक सांस्कृतिक आणि वैदिक ज्ञान महोत्सव व 'वृषभ कला' प्रदर्शनाचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

● नागपूर, नितीन देवळेकर :

ज्ञान, साधना, सुरक्षा आणि कृषी याबाबत महत्त्वपूर्ण विचारांद्वारे साहित्य, कला, संस्कृती आणि सभ्यता प्रगल्भ करणारा "असी, मसी और कृषी" चा जीवनमार्ग भगवान वृषभदेव यांनी दाखविला. जगाच्या कल्याणासाठी हे विचार व ज्ञान येणाऱ्या पिढ्यांपर्यंत पोहोचवणे हा उद्देश असून भारताच्या प्राचीन व महान संस्कृतीचे प्रतीक म्हणजे ऋषभदेवांचे विचार आहेत, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

बोरिवली येथे ऋषभायन – २ या तीन दिवसीय वैश्विक सांस्कृतिक आणि वैदिक ज्ञान महोत्सव प्रसंगी बोलत होते. यावेळी राज्याचे कौशल्य विकास, उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा, आमदार संजय उपाध्याय, आमदार मनीषा चौधरी, माजी खासदार गोपाळ शेट्टी, एल.पी. सिंह, श्री ललित गांधी तसेच जैन मुनी, शिख, बौद्ध आणि हिंदू धर्मगुरू देखील यावेळी उपस्थित होते.





मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, पहिले तीर्थंकर, पहिले सम्राट, भारतीय संस्कृती आणि सभ्यतेचे प्रतिक भगवान ऋषभदेव आहेत. जगाला 'संस्कृती' या संकल्पनेची ओळखही नसताना भारत पूर्ण विकसित सांस्कृतिक अवस्थेत होता, भगवान ऋषभदेव यांनी देशाच्या संस्कृतीसाठी महत्वाचे योगदान दिलेले आहे. मानवजातीला जीवनाचा मार्ग, साहित्य, कला, संस्कृती, अध्यात्म, ज्ञान, शेती, सुरक्षा, प्रेम, आनंद आणि अनंततेची संकल्पना दिली. ऋषभदेव केवळ एका धर्माचे प्रवर्तक नव्हते, तर त्यांनी मानवी संस्कृतीचा पाया रचला.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, भगवान ऋषभदेवांनी पुरुषांसाठी ७२ कला आणि महिलांसाठी ६४ कलांचे विवेचन केले असून, वास्तुकला, धातुकाम, उत्पादन असे ते होते. वैविध्यपूर्ण जीवनपद्धतींचे त्या कलांचे पुनरुज्जीवन व संवर्धन करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य या उपक्रमातून घडत आहे.

पान २ वर

## () थोडक्यात ()

### बावनकुळे यांची निलंबन घोषणेतून माघार; उफाळलेल्या असंतोषावर तोडगा, महसूल कर्मचाऱ्यांचा संप स्थगित



छ. संभाजीनगर : आरेरावीची एकेरी भाषा आणि नाहक केलेले निलंबन यामुळे महसूल कर्मचाऱ्यांमध्ये निर्माण झालेला असंतोष दूर करण्यात बावनकुळे यांनी पुढाकार घेतला. पालघर आणि मावळमधील प्रकरणात विधिमंडळात जाहीर केलेले निलंबन मागे घेण्यात येतील असे आश्वासन देत महसूल कर्मचारी संघटनेसमोर महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी माघार घेतली. त्यामुळे महसूल महासंघाकडून पुकारण्यात आलेले कामबंद आंदोलन स्थगित करण्यात आले आहे.महाराष्ट्र राज्य महसूल कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष जीवन आहेर आणि महाराष्ट्र राज्य तलाठी पटवारी, मंडळाधिकारी समन्वय महासंघाचे अध्यक्ष विजय टेकाळे यांनी आंदोलन तुर्त स्थगित करण्यात आल्याचे कळविले आहे.मावळ प्रकरणातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे निलंबन तीन दिवसात मागे घेतले जाईल त्यासाठी विभागीय आयुक्तांचा अहवाल मागविला जाणार आहे. दरम्यानच्या कालावधीमध्ये जिल्हास्तरील झालेल्या गौण खनिज विषयक सर्व कारवाया मागे घेतल्या जातील, असे आश्वासन मंत्री बावनकुळे यांनी दिले आहे. तसेच पालघरमधील कर्मचाऱ्यांचे निलंबन मागे घेण्यात येतील, असेही आश्वासित करण्यात आले.

## एकत्रित आयुष्मान भारत–महात्मा फुले जन आरोग्य योजनेतील उपचारांची संख्या २,३९९

● मुंबई, विशाल कारंडे :

राज्यात एकत्रित आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेची अंमलबजावणी अधिक प्रभावी करण्यासाठी राज्य शासनाने अनेक महत्त्वपूर्ण आणि रुग्णहिताचे निर्णय घेतले आहेत. या सुधारणांमुळे सर्वसामान्य नागरिकांना अधिक व्यापक, दर्जेदार आणि कॅशलेस आरोग्य सेवा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

या सुधारणांतर्गत उपलब्ध उपचारांची संख्या १,३५६ वरून थेट २,३९९ पर्यंत वाढविण्यात आली असून त्यात गंभीर तसेच विशेष उपचारांचा समावेश मोठ्या प्रमाणात झाला आहे. यासोबतच रुग्णालयांना शासनाकडून मिळणाऱ्या उपचारांच्या दरात वाढ करण्यात आली असून अनेक पॅकेजेसमध्येही सुधारणा करण्यात आल्या आहेत. यामुळे रुग्णालयांचा सहभाग वाढून रुग्णांना अधिक चांगल्या सेवा मिळणार आहेत.

उपचारांची गुणवत्ता अधिक उंचावण्यासाठी एनएबीएच व एनक्यूएएस यांसारखी गुणवत्ता मानके पूर्ण करणाऱ्या रुग्णालयांना दावा रकमेवर अतिरिक्त १० ते १५ टक्के प्रोत्साहन देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे दर्जेदार उपचारांना चालना मिळणार आहे.

योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आणि तक्रार निवारणासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली 'जिल्हा संनियंत्रण व तक्रार निवारण समिती' कार्यान्वित करण्यात आली आहे. तसेच या कामाचा आढावा घेऊन मार्गदर्शन करण्यासाठी पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली 'जिल्हास्तरीय जन आरोग्य संरक्षण कार्यकारिणी' गठित करण्यात आली आहे.

रुग्णांना माहिती मिळावी किंवा सेवा मिळण्यात अडचण आल्यास संपर्क साधण्यासाठी २४ तास कार्यरत टोल फ्री कॉल सेंटर सेवा सुरू करण्यात आली असून १५५३८८ / १८००२३३२२०० तसेच १४५५५ / १८००१११५६५ हे क्रमांक उपलब्ध करून देण्यात आले आहेत. पान २ वर

## वाशी सुविधा केंद्रातून हंगामातील डाळिंबाचा पहिला कंटेनर समुद्रमार्गे अमेरिकेसाठी रवाना – पणन मंत्री जयकुमार रावल यांची माहिती

● मुंबई, दिगंबर जाधव :



महाराष्ट्रात उत्पादित डाळिंबाचा हंगामातील पहिला कंटेनर मुंबईतील जेएनपीटी बंदरातून समुद्रमार्गे अमेरिकेसाठी रवाना करण्यात आला आहे. कृषी पणन मंडळाच्या वाशी, नवी मुंबई येथील विकिरण सुविधा केंद्रावरून हा कंटेनर रवाना करण्यात आला असून राज्यातील फळनिर्यातीच्या दृष्टीने हा एक महत्त्वाचा टप्पा आहे, अशी माहिती पणन व राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी दिली.

अमेरिका – भारत कृषी-निर्यातविषयक घडणाऱ्या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर दोन्ही देशांमध्ये उच्चस्तरीय चर्चा सुरू आहेत. अशा परिस्थितीत डाळिंबाचा पहिला कंटेनर रवाना होणे हे भारताची विश्वासार्हता, गुणवत्ता आणि आंतरराष्ट्रीय मानकांशी सुसंगततेचे प्रतीक असल्याचे मानले जात आहे.

**जागतिक स्पर्धेत टिकेल अशी पणन व्यवस्था सक्षम करण्यासाठी शासन प्रयत्नशील**

पणनमंत्री जयकुमार रावल यांनी सांगितले की, महाराष्ट्रातील उत्पादित होणाऱ्या फळे, पान २ वर

## कुंभमेळ्यासाठी पूर्वपरवानगीशिवाय झाडे तोडायला बंदी; मुंबई उच्च न्यायालयाचा सज्जड दम

● मुंबई, सचिन कदम :

नाशिकमध्ये २०२७ च्या सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी पूर्वपरवानगीशिवाय एकही झाड तोडू नये, असा सज्जड दम मुंबई उच्च न्यायालयाने गुरुवारी दिला. कुंभमेळ्यासाठी प्रस्तावित वृक्षतोडीसाठी अजूनही जनतेच्या सूचना व आक्षेपांचा आढावा घेत असल्याचे महाराष्ट्र सरकारने उच्च न्यायालयात सांगितले.



मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती गौतम अखंड यांच्या खंडपीठाने झाडे तोडण्यास तूर्तास स्थगिती देण्यास नकार देत राज्य सरकारसह नाशिक महापालिका आणि वृक्ष प्राधिकरणाला नोटीस जारी करत उत्तर देण्याचे निर्देश दिले. तसेच तूर्तास ही वृक्षतोड सुरू करू नये, पान २ वर

## बांगलादेश पुन्हा पेटले!; शेख हसीनांचा कट्टर विरोधक उस्मान हादीच्या मृत्यूनंतर हिंसाचार;

● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :

बांगलादेशातील युवा नेते आणि पदच्युत माजी पंतप्रधान शेख हसीना यांचे कट्टर टीकाकार शरीफ उस्मान हादी यांच्या मृत्यूनंतर गुरुवारी रात्रीपासून देशात मोठ्या प्रमाणावर अशांतता पसरली आहे. राजधानी ढाक्यात हिंसक आंदोलन उफाळून आले असून आघाडीच्या वृत्तपत्रांच्या कार्यालयांवर हल्ले आणि जाळपोळ करण्यात आली. यात अनेक पत्रकार आणि कर्मचारी जळत्या इमारतींमध्ये अडकून पडले.





३२ वर्षीय शरीफ उस्मान हादी यांचे गुरुवारी सिंगापूरमधील रुग्णालयात निधन झाले. १२ डिसेंबर रोजी मोटारसायकलवरून आलेल्या मुखवटाधारी हल्लेखोरांनी त्यांच्यावर गोळीबार केला होता. रिक्षातून प्रवास करत असताना त्यांच्यावर हल्ला झाला आणि गंभीर जखमी अवस्थेत त्यांना उपचारांसाठी परदेशात हलवण्यात आले होते.

हा गोळीबार २०२४ विद्यार्थी चळवळीनंतर बांगलादेशात होणाऱ्या पहिल्या निवडणुकांची तारीख जाहीर झाल्यानंतर अवघ्या एका दिवसात झाला होता. या निवडणुकीत हादी हे अपक्ष उमेदवार म्हणून लढण्याच्या तयारीत होते.

**हादीच्या मृत्यूनंतर संतप्त निदर्शने; कार्यालयांना आग**

हादी यांच्या मृत्यूची बातमी गुरुवारी उशिरा आणि शुक्रवारी पहाटे पसरताच शेकडो समर्थक ढाक्याच्या रस्त्यांवर उतरले. 'न्याय द्या' आणि आरोपींना अटक करा, अशी मागणी करत आंदोलनाला हिंसक वळण मिळाले. अग्निशमन व नागरी संरक्षण दलाच्या प्रवक्त्यानुसार, राजधानीत किमान तीन ठिकाणी जाळपोळीच्या घटना घडल्या. यात बांगलादेशातील आघाडीची वृत्तपत्रे द डेली स्टार आणि प्रथम आलो यांच्या कार्यालयांचा समावेश आहे.

पान २ वर

## मुंबई (पूर्व) आरटीओत MH03FB नवीन नोंदणी मालिका सुरू

● मुंबई, राकेश गायकवाड :

मुंबई (पूर्व) प्रादेशिक परिवहन कार्यालयात परिवहन संवर्गातील चारचाकी वाहनांच्या नोंदणीसाठी नवीन MH03FB ही मालिका लवकरच सुरू करण्यात येणार आहे. सध्या वापरात असलेली MH03ES मालिका संपत आल्याने ही नवीन मालिका २२ डिसेंबर २०२५ पासून लागू होणार आहे. या नव्या मालिकेतून आकर्षक किंवा पसंतीचा नोंदणी क्रमांक आरक्षित करू इच्छिणाऱ्या वाहनधारकांनी विहीत नमुन्यातील अर्ज सादर करावा. अर्जासोबत पत्त्याचा पुरावा, ओळखपत्र, पॅन कार्ड तसेच पसंतीच्या क्रमांकासाठीची विहित फी राष्ट्रीयकृत बँकेच्या धनाकर्षासह Regional Transport Office, Mumbai (East) किंवा RTO, Mumbai (East) यांच्या नावे काढून २४ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी २ वाजेपर्यंत अर्ज सादर करणे आवश्यक आहे.एकाच नोंदणी क्रमांकासाठी एकापेक्षा अधिक अर्ज प्राप्त झाल्यास, महाराष्ट्र शासनाच्या ३० ऑगस्ट २०२४ च्या अधिसूचनेनुसार नियमीत फी व्यतिरिक्त सर्वात जास्त रक्कमेचा धनाकर्ष सादर करणाऱ्या अर्जदारास तो नोंदणी क्रमांक देण्यात येणार आहे.



आकर्षक व पसंतीचा नोंदणी क्रमांक देण्याची सविस्तर कार्यपद्धती कार्यालयाच्या सूचना फलकावर लावण्यात आली असून, अनधिकृत व्यक्तीकडून होणारी फसवणूक टाळण्यासाठी वाहनधारकांनी स्वतःच आरटीओ कार्यालयात अर्ज करण्याचे प्रादेशिक परिवहन अधिकारी पल्लवी कोठावदे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे आवाहन केले आहे. पान २ वर

## संपादकीय

### ‘जेन झी’ने आणखी एक सरकार उलथवले

जगभरात ‘जेन झी’ चळवळ फोफावते आहे. आता युरोपातील एका देशात आक्रमक आंदोलने झाली. पंतप्रधानांनी तडकाफडकी राजीनामा दिला. सरकार कोसळल्याने तेथे पुढे काय होणार, याकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागले आहे.युरोपातील बल्गेरिया या देशात अभूतपूर्व घडामोडी घडल्या आहेत. संतप्त तरुणाई रस्त्यावर उतरली. त्यास नागरिकांनी उदंड प्रतिसाद दिला. पाहता पाहता मोठा जनसागर उसळला. अवघ्या ७२ तासांमध्येच सरकारला गुडघे टेकावे लागले. परिणामी, गेल्या पाच वर्षांत सहाव्या पंतप्रधानांना राजीनामा द्यावा लागला. जगभरातच लोकशाही व्यवस्थेवर आघात होत आहेत. बल्गेरियाही त्यातून सुटले नाही. तिथे हे सगळे का आणि कसे घडले? आता तिथे पुढे काय होणार?

युरोप म्हणजे स्थैर्य, लोकशाही परंपरा आणि आर्थिक शिस्त, अशी प्रतिमा दीर्घकाळ जोपासली गेली, असे बोलले जाते. मात्र गेल्या दशकभरात ही प्रतिमा हळूहळू बदलत चालली आहे. फ्रान्समधील आंदोलने, इटलीतील अस्थिर सरकार, पूर्व युरोपमधील सत्तासंघर्ष आणि आता बल्गेरियात कोसळलेले सरकार. बल्गेरियातील सध्याची घटना ही एखादी अपघाती राजकीय घटना नक्कीच नाही. तर ती लोकशाही व्यवस्थेतील खोलवरच्या परिणामांची जाणीव करून देणारी घटना आहे.२०२१ पासून बल्गेरियात सातत्याने सरकारे येत-जात आहेत. निवडणुका होतात, आघाड्या बनतात, घोषणांची बरसात होते आणि काही महिन्यांतच सरकार कोसळते. हा प्रश्न केवळ राजकीय गणिताचा नाही तर तो लोकशाहीच्या आशयाचा आहे. जेव्हा निवडणूक ही समस्यांचे उत्तर न राहता समस्येचाच भाग बनते, तेव्हा लोकशाहीचा आत्मा संकटात सापडतो. बल्गेरियात हेच सारे घडते आहे. बल्गेरियात कोणत्याही पक्षाला स्पष्ट बहुमत मिळत नाही. परिणामी सत्तेसाठी वैचारिकदृष्ट्या विसंगत पक्ष एकत्र येतात. या आघाड्या केवळ सत्तेसाठी असतात; धोरणात्मक सुसंगतीसाठी नव्हे. त्यामुळे सरकार निर्णय घेण्याआधीच कमकुवत ठरते. परिणामी जनतेचा उद्रेक होणे अपरिहार्यच बनते.बल्गेरियात सरकार कोसळण्यामागे सर्वात मोठा मुद्दा आहे तो भ्रष्टाचाराचा. हा भ्रष्टाचार एखाद्या व्यक्तीपुरता किंवा पक्षापुरता मर्यादित नाही; तो संपूर्ण व्यवस्थेत खोलवर रुजलेला आहे, अशी भावना जनतेत आहे. सरकारी कंत्राटे, न्यायालयीन प्रक्रिया, पोलीस यंत्रणा अशा सर्वच पातळ्यांवर ‘सत्ताधाऱ्यांसाठी वेगळे नियम आणि सामान्यांसाठी वेगळे’ अशी धारणा बळावत गेली आहे. युरोपियन युनियनचा सदस्य असलेला देशही भ्रष्टाचार नियंत्रणात अपयशी ठरत असल्याचे चित्र उभे राहिले. याच पार्श्वभूमीवर २०२५ मधील आंदोलने केवळ आर्थिक नव्हती; ती न्यायासाठीची आणि स्वाभिमानासाठीची आंदोलने होती. बल्गेरिया सरकारने मांडलेले २०२६ चे अंदाजपत्रक हे आंदोलनांना कारणीभूत ठरले. करवाढ, खर्चात कपात आणि सामाजिक सुरक्षेवर मर्यादा या उपाययोजना कागदावर शिस्तीच्या वाटत असल्या, तरी प्रत्यक्षात त्या सामान्य नागरिकांच्या जखमेवर मीठ चोळणाऱ्या ठरल्या. महागाईने आधीच कंबर मोडलेली असताना, सरकार ‘आर्थिक शिस्त’ या नावाखाली सामान्यांवरच बोजा टाकत असल्याची भावना निर्माण झाली. परिणामी तरुण, मध्यमवर्गीय आणि निवृत्त नागरिक मोठ्या प्रमाणावर रस्त्यावर उतरले.पंतप्रधान रोझेन झेलीयाझकेव्ह यांच्या नेतृत्वात आघाडीचे सरकार कार्यरत होते. मात्र, घटक पक्षांनी त्यांना ठोस काम करूच दिले नाही. अल्प बहुमत असल्याने त्यांना काम करणे खूप अवघड बनले. भ्रष्टाचार, नेत्यांचा कारभार, कंत्राटे देण्यातील अपारदर्शकता, न्यायव्यवस्थेच्या समस्यांबद्दल जनता संतप्त झाली. सुरुवातीला आर्थिक विषयांवरून आंदोलन सुरू झाले. नंतर ते सरकारच्या भ्रष्ट कारभारावर गेले. आंदोलनात तरुणांची संख्या लक्षणीय होती. सोशल मीडियापासून थेट रस्त्यावर उतरण्यापर्यंतच्या सर्वच पातळ्यांना वेग आला. ‘जनरेशन झेड इज कमिंग’, ‘बल्गेरिया विदाऊट माफिया’ यासारखे फलक आंदोलकांकडून झळकवले जात होते. विद्यार्थी व तरुण रस्त्यावर उतरत असल्याने विरोधी पक्षांनीही त्याचे समर्थन केले. सरकारला धारेवर धरले. नागरिकांचा पुढाकार असे स्पष्ट करीत सरकारविरोधी घोषणाबाजीने देशभरात उग्र रूप धारण केले. राष्ट्राध्यक्ष रोमेन रादेव यांनीही सरकारच्या राजीनाम्याची मागणी करत जनतेचा आवाज ऐकण्याचे आवाहन केले. ‘भ्रष्टाचार संपवावा, जनतेला न्याय द्यावा’ या घोषणेने संपूर्ण बल्गेरिया पेटून उठले. अखेर पंतप्रधानांना राजीनामा द्यावा लागला.

- अनिकेत घनश्याम भंकाळ

## आजची चित्रोळी



विद्युत रुपे आम्ही बांधले
सूर्याला जाळयात !
अंधाराला आणि हरवले
बदलण्यास ज्ञानात !!

मुकुंद कुलकर्णी

# माणिकराव कोकाटे यांना जेल नाही : बेल मंजूर, मुंबई उच्च न्यायालयाकडून दिलासा, आमदारकी वाचली



**मुंबई (विशाल कारंडे) :** शासकीय कोट्यातून सदनिका लाटल्याप्रकरणी माजी मंत्री माणिकराव कोकाटे यांची अटक टळलीय. याप्रकरणी नाशिक सत्र न्यायालयानं कोकाटेंना सुनावलेली दोन वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा मुंबई उच्च न्यायालयानं तात्पुरती स्थगित करत त्यांना एक लाखांच्या जातमुचलक्यावर जामीन मंजूर केलाय. मात्र, या घोटाळयात त्यांना दोषी ठरवण्याचा नाशिक सत्र न्यायालयाचा निकाल मात्र उच्च न्यायालयानं कायम ठेवलाय. माणिकराव कोकाटे यांनी यासंदर्भात उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेवर शुक्रवारी न्यायमूर्ती आर.एन. लढ्ढा यांच्या एकलपीठापुढे सुनावणी झाली.

**काय आहे प्रकरण? :** नाशिक शहरातील कॅनडा कॉर्नरसारख्या मोक्याच्या ठिकाणी असलेल्या अपार्टमेंटमध्ये बनावट कागदपत्रांच्या आधारे फसवणूक करून माणिकराव कोकाटे व त्यांचा भाऊ विजय कोकाटे यांनी दोन सदनिका लाटल्याचा आरोप आहे. मुख्यमंत्री स्वेच्छाधिकार योजनेच्या दहा टक्के राखीव कोट्यातून या सदनिका हडपल्या असून, माजी मंत्री तुकाराम दिघोळे यांनी याप्रकरणी माणिकराव कोकटेंविरोधात तक्रार दाखल केली होती. या प्रकरणी नाशिक दंडाधिकारी न्यायालयाने कोकाटे यांना दोषी ठरवत दोन वर्षे तुरुंगवास व ५० हजार रुपये दंडाची शिक्षा ठोठावली होती. नुकतीच नाशिक सत्र न्यायालयानं दंडाधिकाऱ्यांनी ठोठावलेली ही शिक्षा कायम ठेवत कोकाटे यांना कोणताही दिलासा देण्यास नकार दिलाय. इतकंच नव्हे तर याप्रकरणी माणिकराव कोकाटेंविरोधात अटक वॉरंटही जारी करण्यात आलं. त्यामुळे या शिक्षेला कोकाटे यांनी तातडीनं मुंबई उच्च न्यायालयात आव्हान दिलं होतं.

**न्यायालयातील युक्तिवाद :** या याचिकेवर शुक्रवारी न्यायमूर्ती आर.एन. लढ्ढा यांच्या एकलपीठासमोर सुनावणी घेण्यात आली. त्यावेळी माणिकराव कोकाटेंच्या वतीनं ज्येष्ठ वकील रवी कदम आणि अनिकेत निकम यांनी युक्तिवाद केला. तर राज्य सरकारतर्फे मुख्य सरकारी वकील मनकूँवर देशमुख यांनी युक्तिवाद करत माणिकराव कोकाटेंच्या याचिकेला विरोध केला.

**तक्रारदारांचा दावा :** कोकाटेंतर्फे न्यायालयात सांगण्यात आलं की, साल १९८८-८९ मध्ये माझी दरमहा मिळकत २५०० रूपये इतकी होती. त्यानंतर पुढे १९९३-९४ च्या वर्षात वाढून दरमहा ३५ हजारांपर्यंत झाली होती. त्यामुळे सदर योजनेत त्यांनी रितसर अर्ज केला होता. याची सर्व कागदपत्रही त्यांनी सादर केली होती. मात्र तरीही न्यायालयानं दोषी ठरवताना या गोष्टी ग्राह्य धरलेल्या नाहीत. जेव्हा या योजनेत कोकाटेंनी अर्ज भरला होता तेव्हा ते त्यात बसत होते, मग फसवणुकीचा आरोप कसा करण्यात आला? फसवणूक ही पहिल्या पायरीपासून सुरू होते, ती कधीही मध्येच सुरू होत नाही.

कालांतरानं एखाद्याची मिळकत वाढत गेली म्हणून पहिल्या पायरीवर त्यानं फसवणूक केली होती हे कसं सिद्ध होतं? मात्र या याचिकेल विरोध करत तक्रारदारांच्या वतीनंही युक्तिवाद करण्यात आला. ज्यात त्यांनी न्यायालयाला माणिकराव कोकाटे यांचा दावा कसा फोल आहे हे सत्र न्यायालयाच्या निकालावरून पटवून दिलं. कश्या पद्धतीनं शेतकरी नसतानाही ते शेतकरी असल्याचं सांगण्यात आलं. कुटुबीयांनी एका रेशन कर्डाची दोन रशन कार्ड केली, जणेकरून दोन भावांना दोन अर्ज करता येतील. या सर्व गोष्टी विचारात घेऊनच नाशिक सत्र न्यायालयानं निकाल दिलाय. हे तक्रारदारांच्या वतीनं न्यायालयात सांगण्यात आलं.

**अटक टळली, आमदारकी वाचली :** बनावट कागदपत्रांच्या आधारे शासकीय सदनिकांचा लाभ घेतल्याप्रकरणी अडचणीत आलेले माणिकराव कोकाटे यांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिला होता. असं असलं तरी अद्याप त्यांच्या अडचणी कमी झालेल्या नाहीत. मात्र, उच्च न्यायालयाच्या निकालानंतर कोकाटे यांची अटक टळली असून, आमदारकीही वाचली आहे.

## पान १ वरून...

### भगवान ऋषभदेवांचे विचार भारताच्या...

देश, संस्कृती, अभिमान आणि स्वाभिमान यांसाठी हे कार्य अद्वितीय व अत्यंत मोलाचे असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

याप्रसंगी जैन, बौद्ध, सनातन, शीख आदी विविध परंपरांचे वाहक एकत्र आले असून, सर्वांनी एकत्रितपणे भगवान ऋषभदेवांच्या विचारांना वंदन केले. सर्व संत, ऋषी, महंत, साध्वी आणि भिक्षू यांची एकाच व्यासपीठावर उपस्थिती ही भारतीय ज्ञान प्रणाली भावी पिढ्यांपर्यंत पोहोचवण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची असल्याचे त्यांनी सांगितले.

विशेषत: जैन संतांनी ध्यान, साधना आणि लोककल्याणाच्या भावनेतून आपले विचार समाजापर्यंत पोहोचवले असून, ते मानवतेसाठी प्रेरणादायी ठरत असल्याचे मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केले.

**भगवान ऋषभदेवांचे विचार जगासमोर मांडण्यासाठी जागा उपलब्ध करून देणार**

भगवान ऋषभदेवांसाठी एक जागतिक दर्जाचे, योग्य व समर्पित स्थान निर्माण करण्याबाबत चर्चा करण्यात येईल आणि त्यांनी दिलेले ज्ञान, कला, आणि सांस्कृतिक मूल्ये एकत्रितपणे जगासमोर मांडण्यासाठी शासनाच्या वतीने जागा देण्यात येईल, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. जैन मुनी यांनी या कार्यासाठी येथे जागा उपलब्ध करुन द्यावी, अशी मागणी केली होती.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक जैन मुनी श्रीमद्. विजय यशोवर्मसुरीश्वरजी महाराज यांनी केले.

**‘वृषभ कला’ प्रदर्शनाचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन**

‘वृषभ कला’ या दालन व प्रदर्शनाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. ‘भारतीय संस्कृती’ चे पुरोधा राजा भगवान ऋषभ यांच्या वरील कला दालनाद्वारे ऋषभदेव यांनी केलेल्या कार्याचा त्यांच्या विचारांचा परिचय दिला जात आहे.

ऋषभायन-२ या आंतरराष्ट्रीय परिषदेनिमित्ताने ‘ऋषभयन’ या संकल्पनेतून साकार झालेल्या ११११ ग्रंथांचे प्रकाशन करण्यात आले. हे सर्व ग्रंथ सखोल संशोधनावर आधारित असून त्यांची संख्या १,४०० पर्यंत पोहोचणार आहे.

यावेळी भगवान ऋषभ यांच्या जीवनावर आधारित पुस्तिका तयार करण्यात आली असून, ती येत्या दोन-तीन दिवसांत सुमारे एक लाख नागरिकांपर्यंत वितरित केली जाणार आहे. या पुस्तिकेचे प्रकाशन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले.

### एकत्रित आयुष्मान भारत–महात्मा...

प्रत्येक अंगीकृत रुग्णालयात दर्शनी भागात योजनेचे कक्ष स्थापन करणे बंधनकारक करण्यात आले असून या कक्षात ‘आरोग्यमित्र’ नियुक्त करण्यात आले आहेत. आरोग्यमित्रांच्या माध्यमातून रुग्णांना योजनेबाबत माहिती देणे, कागदपत्रांची पूर्तता करणे तसेच रोख विरहित उपचार मिळवून देण्यासाठी आवश्यक ते मार्गदर्शन केले जाणार आहे.

योजनेतून उपचार व सुविधा मिळण्यासंदर्भातील तक्रारींचे तात्काळ निराकरण करण्याची जबाबदारी जिल्हा समन्वयक, क्षेत्रीय व्यवस्थापक, अंमलबजावणी सहाय्य संस्थांचे जिल्हा व विभाग प्रमुख तसेच जिल्हा वैद्यकीय अधिकारी यांच्यावर निश्चित करण्यात आली आहे. संबंधित सर्व अधिकाऱ्यांचे संपर्क क्रमांक रुग्णालयातील कक्षात ठळकपणे प्रदर्शित करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

या सर्व सुधारणांमुळे राज्यातील नागरिकांना अधिक विश्वासार्ह, सुलभ आणि गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा उपलब्ध होणार असून आरोग्य संरक्षणाच्या दिशेने हा एक महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.

### वाशी सुविधा केंद्रातून हंगामातील...

भाजीपाला आणि इतर शेतमालाला राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय बाजारात स्पर्धात्मक दर मिळण्यासाठी जागतिक स्पर्धेत टिकेल अशी पणन व्यवस्था सक्षम करण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. आंबे, डाळिंब इतर फळे व भाजीपाला उत्पादक शेतकऱ्यांच्या मेहनतीला जागतिक बाजारपेठेत स्पर्धात्मक मूल्य मिळावे, यासाठी राज्य शासन, कृषी पणन मंडळ आणि केंद्र शासन प्रयत्नशील आहे. अमेरिकेसाठी जेएनपीटी बंदरातून हंगामातील पहिला डाळिंब कंटेनर रवाना होणे हे राज्याच्या कृषी-निर्यात क्षमतेसाठी तसेच शेतकऱ्यांना उत्पन्नवाढीच्या दृष्टीने प्रोत्साहित करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे पाऊल आहे. येणाऱ्या काळात निर्यात सुविधा केंद्रातून मोठ्या क्षमतेने डाळिंब निर्यात केले जाणार आहेत.

भारतीय डाळिंबांचा अमेरिकन बाजारपेठेतील वाटा वाढल्यास राज्यातील डाळिंब उत्पादक शेतकऱ्यांचे उत्पन्न २० ते ३० टक्क्यांपर्यंत वाढण्याची शक्यता असल्याचेही पणन मंत्री रावल यांनी नमूद केले. यासाठी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, अपेडा, एनपीपीओ व निर्यातदार अमेरिकन अधिकाऱ्यांसोबत सातत्याने तांत्रिक व धोरणात्मक पातळीवर कार्यरत आहेत.

**डाळिंबाची प्रतवारी व प्रक्रिया आंतरराष्ट्रीय मानकांनुसार**

२०१७-१८ मध्ये काही तांत्रिक कारणामुळे अमेरिकेला भारतातून डाळिंब निर्यात बंद झाली होती. परिणामी जवळपास सहा वर्षे भारतीय डाळिंब अमेरिकन बाजारपेठेत पोहोचू शकला नव्हता. निर्यात पुन्हा सुरू करण्यासाठी केंद्र शासनाच्या अपेडा व राष्ट्रीय वनस्पती संरक्षण संस्था (एनपीपीओ) यांनी अमेरिकेच्या कृषी विभागाशी (यू.एस.डी.ए.) तांत्रिक व प्रशासकीय पातळीवर सातत्याने चर्चा करून कृषी पणन मंडळाच्या विकिरण सुविधा केंद्रावर आवश्यक चाचण्या घेऊन अहवाल सादर केले. पॅक-हाऊसमध्ये डाळिंबाची प्रतवारी व प्रक्रिया आंतरराष्ट्रीय मानकांनुसार करण्यात आली. त्यानंतर यू.एस.डी.ए. व एनपीपीओ अधिकाऱ्यांच्या प्रत्यक्ष तपासणीनंतर विकिरण प्रक्रिया पार पाडण्यात आली. ४,८०० बॉक्सेसमधून १७,६१६ किलो (सुमारे १७.६ मेट्रिक टन) डाळिंब निर्यात करण्यात आली आहे.

सन २०२४ मध्ये अमेरिकेने निर्यातीसाठी काही शास्त्रीय निकष लागू केले आहेत. यामध्ये माईट वॉश प्रोटोकॉल, सोडियम हायपोक्लोराईडद्वारे निर्जंतुकीकरण तसेच वॉशिंग व ड्रायिंग प्रक्रिया बंधनकारक करण्यात आली आहे. तसेच डाळिंबाचे चार किलो क्षमतेच्या प्रमाणित बॉक्समध्ये पॅकेजिंग करून अधिकृत विकिरण सुविधा केंद्रात विकिरण प्रक्रिया करण्यात आली आहे. या सर्व प्रक्रिया यूएसडीए व एनपीपीओ अधिकाऱ्यांच्या प्रत्यक्ष तपासणी व मान्यतेनंतरच पूर्ण केल्या गेल्या आहेत.

या प्रसंगी यूएसडीए निरीक्षक रॉबर्टो रिवाझ, एनपीपीओचे डॉ. बी.एल. मिना, कृषी पणन मंडळाचे विभाग प्रमुख अनिमेष पाटील, अपेडाचे बामणे तसेच संबंधित अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

**३०० मेट्रिक टन डाळिंब निर्यातीचे नियोजन**

कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी यावेळी चालू २०२५-२६ हंगामात अमेरिकेस सुमारे ३०० मेट्रिक टन डाळिंब निर्यातीचे नियोजन करण्यात आले असल्याची माहिती दिली. अमेरिकेतील बाजारपेठेत डाळिंबाची मागणी झपाट्याने वाढत असून, तेथील डाळिंब बाजारपेठ सध्या अंदाजे १.२ ते १.५ अब्ज अमेरिकी डॉलर इतकी आहे. विशेषतः भारतीय ‘भगवा’ व ‘सुपर भगवा’ जातींना चव, रंग व साखर-आम्ल संतुलनामुळे अधिक मागणी आहे.

### कुंभमेळ्यासाठी पूर्वपरवानगीशिवाय झाडे...

असे तोंडी निर्देश प्रशासनाला देत सुनावणी १४ जानेवारीपर्यंत तहकूब ठेवली.

राज्य सरकारने नाशिकच्या तपोवन परिसरात कुंभमेळ्यासाठी २०२६ ते २०२७ दरम्यान येणाऱ्या साधूंसाठी उभारण्यात येणारे निवासी संकुल बांधण्यासाठी सुमारे १८०० झाडे तोडण्याचा प्रस्ताव मांडला आहे. या वृक्षतोडीला नाशिकबरोबरच विविध भागातून विरोध होत आहे.

राज्य सरकारचे महाधिवक्ता मिलिंद साठे यांनी न्यायालयाला सांगितले की, वृक्ष प्राधिकरणाची प्रक्रिया अजूनही सुरू आहे. नाशिक महानगरपालिका जनतेकडून सूचना आणि आक्षेप मागवत असून अद्याप अंतिम निर्णय घेतलेला नाही.

राज्य सरकारच्या झाडे तोडण्याच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या याचिकांवर न्यायालय सुनावणी करत होते. यापैकी एक याचिका नाशिकचे रहिवासी, उद्योजक आणि कृषी व्यावसायिक मधुकर जगताप यांनी दाखल केली आहे. त्यांनी अधिकाऱ्यांना वृक्षतोड थांबवण्याचे निर्देश देण्याची आणि मोठ्या प्रमाणावर झाडे तोडण्याची गरज नसलेल्या पर्यायी जागांचा शोध घेण्याची मागणी केली आहे.

दुसरी याचिका नाशिकमधील अधिवक्ता नितीन पद्माकर पंडित यांनी दाखल केली आहे. नागरिकांनी ‘चिपको आंदोलन’ शैलीतील आंदोलन करून झाडे वाचवण्याचा प्रयत्न केल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. मोठ्या प्रमाणावर वृक्ष तोड केल्यास जैवविविधतेवर गंभीर परिणाम होईल आणि या प्रदेशातून उगम पावणाऱ्या गोदावरी नदीवरही विपरित परिणाम होईल, असे याचिकेत नमूद केले आहे.

यापूर्वी, राष्ट्रीय हरित लवादाने १५ जानेवारी २०२५ पर्यंत झाडे तोडण्यास स्थगिती दिली होती. साधूंसाठी तात्पुरत्या निवासी सुविधांसाठी हिरव्यागार तपोवन परिसरातील झाडे तोडण्याच्या प्रस्तावाबाबत आक्षेप आणि सूचना मागवण्यासाठी नाशिक महापालिकेने ११ नोव्हेंबर रोजी सार्वजनिक नोटीस काढली आहे.

### बांगलादेश पुन्हा पेटले!; शेख...

आंदोलकांच्या गटांनी दोन्ही वृत्तपत्रांच्या कार्यालयांमध्ये घुसखोरी करत तोडफोड केली आणि नंतर इमारतींना आग लावली. आगीमुळे कार्यालयांमध्ये धूर भरला आणि अनेक पत्रकार आत अडकले.

**‘मला श्वास घेता येत नाही’**

द डेली स्टारच्या पत्रकार झायमा इस्लाम यांनी जळत्या इमारतीत अडकले असताना फेसबुकवर भावनिक पोस्ट लिहिली. “मला आता श्वास घेता येत नाहीये. खूप धूर झाला आहे. मी आत अडकले आहे. तुम्ही मला मारत आहात,” असे त्यांनी लिहिले. अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, पहाटे १.४० वाजता आगीवर नियंत्रण मिळवण्यात आले. मात्र त्या वेळीही २७ कर्मचारी इमारतीत अडकले होते. “आम्ही इमारतीच्या मागील बाजूला आश्रय घेतला होता. बाहेर आंदोलकांच्या घोषणांचे आवाज ऐकू येत होते,” असे डेली स्टारचे पत्रकार अहमद दीप्तो यांनी AFP ला सांगितले.

वृत्तकक्षातील कर्मचाऱ्यांना आधीच फोनवरून इशारा देण्यात आला होता की जमाव कार्यालयाकडे येत आहे. कर्मचारी खाली उतरण्याचा प्रयत्न करत असतानाच खालच्या मजल्यांवर तोडफोड करून आग लावण्यात आली. रात्रीच्या शिफ्टमधील कर्मचारी जीव वाचवण्यासाठी छतावर पळाले. तब्बल चार तासांच्या बचावकार्यानंतर किमान २५ पत्रकारांची सुटका करण्यात आली. अग्निशमन दलाने शिड्यांच्या मदतीने लोकांना बाहेर काढले, तर नंतर लष्करालाही परिसरात तैनात करण्यात आले. “शेकडो लोक येथे जमले होते आणि त्यांनी हल्ला केला,” असे एका पोलिस अधिकाऱ्याने BBC बांग्लाला सांगितले.

**माध्यम संस्थांनाच का लक्ष्य?**

दोन्ही माध्यमे अंतरिम प्रमुख मुहम्मद युनूस यांना मवाळ पाठिंबा देत असल्याचे मानले जाते. तरीही त्यांनाच लक्ष्य का करण्यात आले, याबाबत अद्याप स्पष्टता नाही.

दरम्यान, दूरदर्शनवरून राष्ट्राला संबोधित करताना युनूस यांनी शुक्रवारी मशिदींमध्ये विशेष प्रार्थना आणि शनिवारी राष्ट्रीय शोकदिन जाहीर केला. “हादी यांचे निधन ही देशासाठी भरून न येणारी हानी आहे,” असे ते म्हणाले आणि आंदोलकांना संयम राखण्याचे आवाहन केले.

**भारतासाठीही चिंता वाढली**

हिंसाचाराचा फटका केवळ माध्यम संस्थांपुरता मर्यादित राहिला नाही. स्थानिक वृत्तसंस्थांच्या माहितीनुसार, शेकडो आंदोलकांनी ढाक्यातील भारतीय उपराजदूतांच्या निवासस्थानाला घेराव घातला. त्यानंतर पोलिसांनी अश्रुधूर फेकून जमाव पांगवला.

याशिवाय, राजधानीबाहेर जाणारा एक महत्त्वाचा महामार्ग अडवण्यात आला, चिटगावमध्ये एका माजी मंत्र्याच्या निवासस्थानावर हल्ला झाला आणि ढाक्यातील सांस्कृतिक संस्था छायानटची तोडफोड करण्यात आली.

ढाका विद्यापीठाजवळील शाहबाग चौकात मोठी गर्दी जमली होती. “तू कोण, मी कोण – हादी, हादी” अशा घोषणा दिल्या जात होत्या. AFP नुसार, जातीया छात्र शक्ती आणि नॅशनल सिटिझन पार्टी (NCP) या विद्यार्थी संघटनाही आंदोलनात सहभागी झाल्या.

NCP नेते सरजिस आलम यांनी हादी यांचे हल्लेखोर भारतात पळून गेल्याचा आरोप करत, त्यांना परत पाठवले जाईपर्यंत ढाक्यातील भारतीय उच्चायुक्तालय बंद ठेवण्याची मागणी केली.

“जोपर्यंत हादी भाईंचे मारेकरी भारतातून परत येत नाहीत, तोपर्यंत भारतीय उच्चायुक्तालय बंद राहील. आता किंवा कधीच नाही. आम्ही युद्धात आहोत,” असे त्यांनी AFP ला सांगितले.

**हिंदू तरुणाला मारहाण करून ठार मारले**

दरम्यान, बीबीसी बांग्लाच्या रिपोर्टनुसार, गुरुवारी रात्री बांगलादेशमध्ये संतप्त जमावाने धर्माचा अपमान केल्याच्या आरोपाखाली एका हिंदू व्यक्तीला मारहाण करून ठार मारले. दिपू चंद्र दास असे मृताचे नाव असून तो एका कापड कारखान्यातील कामगार होता. रात्री ९ वाजताच्या सुमारास ही घटना घडली. ठार मारल्यानंतरही जमावाने त्याचा मृतदेह झाडाला बांधला आणि जाळून टाकला. नंतर, पोलीस घटनास्थळी पोहोचले, त्यांनी परिस्थिती नियंत्रणात आणली आणि मृतदेह ताब्यात घेतला. मृतदेह शवविच्छेदनासाठी मैमनसिंग मेडिकल कॉलेज रुग्णालयात पाठवण्यात आला आहे.

### मुंबई (पूर्व) आरटीओत...

अधिक माहितीसाठी प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (पूर्व), २ रा व ३ रा मजला, बी-२ इमारत, वडाळा ट्रक टर्मिनल, वडाळा, मुंबई ४०० ०३७ (इमेल : rto.03-mh@gov.in; दूरध्वनी क्र. ०२२-२४०३६२२१) येथे संपर्क साधावा.

Printed, Published and Owned by Rakesh Shankar Gore and Printed at Somani Printing Press, Unit no.04, Ground Floor, N.K. Industrial Estate, off. Aarey Road, near Pravasi Ind. Estate, Gate no.2, Goregaon (east) Mumbai-400063, and Published at Shop no. १२, B-2, Sai Dham Shopping Center, Mangal Nagar,१५ No. Last Bus Stop, Near G.C.C. Club, Mira Road (east), Dist: Thane-401107, Maharashtra. Editor-Rakesh Shankar Gore. RNI REG. No: MAHBIL/2023/86118. Office Contact no. 9702386118, Email: dainiklokrakshanay@gmail.com, Website: www.lokrakshanay.com (ठाणे न्याय कक्षेत)

# पालघर जिल्ह्यातील वीटभट्टीवरील स्थलांतरित लाभार्थ्यांची आरोग्य तपासणी

**पालघर (सुचिता सोनावणे) :** पालघर जिल्ह्यातील वीटभट्टी व बांधकाम क्षेत्रात कार्यरत स्थलांतरित कामगार व त्यांच्या कुटुंबीयांच्या आरोग्य सुरक्षेसाठी आरोग्य तपासणी शिबिर उपक्रमाला आरंभ झाला आहे. जिल्ह्यातील आठ तालुक्यातील ५१९ वीटभट्ट्यांवरील २० हजार स्थलांतरित लाभार्थ्यांच्या आरोग्य तपासणीसाठी मोहीम राबवण्यात येणार आहे.



जिल्हाधिकारी डॉ. इंदुराणी जाखड, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद मनोज रानडे , अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र शिंदे यांचे मार्गदर्शनात व जिल्हा प्रशासन आरोग्य व महिला बालविकास विभाग महसूल विभाग यांच्या समन्वयातून मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियाना अंतर्गत दर महिन्याच्या तिसऱ्या गुरुवारी नियमित आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन करण्यात येत आहे.

या उपक्रमांतर्गत पालघर तालुक्यातील चहाडे व कोकणेर येथील वीटभट्टी परिसराला जिल्हा कार्यक्रम अधिकारी व्यंकटराव हुंडेकर आणि उपमुख्य कार्यकारी अधिकारी (मनरेगा) अतुल पारसकर तसेच सर्व बालविकास प्रकल्प अधिकारी तसेच तालुका आरोग्य अधिकारी यांनी भेट देऊन स्थलांतरित लाभार्थ्यांच्या आरोग्य सेवांची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी गरोदर माता, स्तनदा माता तसेच सहा वर्षे पर्यंत च्या वयोगटातील बालकांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

अंगणवाडी सेविकांच्या माध्यमातून लाभार्थ्यांना पोषण आहार, पूरक सेवा व आरोग्यविषयक मार्गदर्शन देण्यात आले. तसेच महा- एमटीएस ॲपवर लाभार्थ्यांची नोंद घेऊन ती अद्ययावत ठेवण्याबाबत कार्यवाही करण्याच्या सूचना जिल्हा कार्यक्रम अधिकारी व्यंकटराव हुंडेकर यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर स्थलांतरित कामगार वास्तव्यास असल्याने त्यांच्या आरोग्यावर विशेष लक्ष देण्यात येत आहे. यासाठी जिल्ह्यातील ४६ प्राथमिक आरोग्य केंद्रे व १८३ सामुदायिक आरोग्य अधिकारी कार्यरत असून, महिला व बाल विकास विभागामार्फत आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

तालुका आरोग्य अधिकारी, बाल विकास प्रकल्प अधिकारी व नोडल अधिकाऱ्यांच्या समन्वयातून ही शिबिरे राबविण्यात येत असून, प्रत्येक लाभार्थ्याची तपासणी करून आवश्यकतेनुसार औषधोपचारही दिले जात आहेत. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष चौधरी व उपजिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. शशिकांत साळुंखे यांचे नियोजनात सदर उपक्रम सुरू आहे

या उपक्रमामुळे स्थलांतरित कुटुंबांच्या आरोग्यस्थितीत सुधारणा होऊन बालकांमधील कुपोषण रोखण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त केला आहे.

# भाईंदरमध्ये रंगला सात तासांचा थरार

## सात जणांना जखमी करणारा बिबट्या अखेर जेरबंद

**भाईंदर (विशाल कारंडे) :** गेल्या काही काळात महाराष्ट्रभरात बिबट्याने ठिकठिकाणी माजवलेल्या दहशतीमुळे भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. तर गाव तसेच जंगल पट्ट्यात बिबट्याचा संचार असल्याच्या चर्चा सर्वत्र रंगल्या असताना. आता भाईंदर सारख्या शहरी भागात बिबट्या आढळून आल्याने सर्वत्र खळबळ माजली होती.



भाईंदर पूर्वेतील स्वामीनारायण मंदिर परिसरातील पारिजात इमारतीत सकाळी सुमारे सातच्या सुमारास बिबट्या दिसून आला. इमारतीच्या आवारात अचानक बिबट्या दिसून आल्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. तर, लोकांची गर्दी आणि आरडाओरड यामुळे घाबरलेला बिबट्या लपण्यासाठी जवळील एका घरात शिरला. त्यावेळी घरात असलेल्या चार जणांवर त्याने हल्ला केला. बिबट्याने केलेल्या हल्ल्यात जखमींच्या शरीरावर मोठमोठ्या घाव झाले असून एक तरुणी यात गंभीर जखमी झाली होती.

या हल्ल्यामुळे घाबरलेल्या नागरिकांनी अग्निशमन दलाला याबाबत माहिती कळवली. घटनेची माहिती मिळताच महापालिकेच्या अग्निशमन विभागाने तातडीने घटनास्थळी धाव घेत बचावकार्य सुरू केले. तर पोलिसांनीही घटनास्थळी पोहोचत लोकांनी बिबट्याला पाहण्यासाठी केलेली गर्दी नियंत्रणात आणली.

सुरुवातीला या घटनेत जखमी झालेल्या चार जणांना साईबाबा या खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यानंतर घटनास्थळी दाखल झालेल्या वन विभागाने बिबट्याला ताब्यात घेण्यासाठी मोहीम हाती घेतली. या कारवाईस आणखी चार तास लागले. या दरम्यान बिबट्याने आणखी तीन जणांवर हल्ला करून त्यांना जखमी केले.

अखेर दुपारी बेशुद्ध करणाऱ्या इंजेक्शनचा वापर करून बिबट्याला ताब्यात घेण्यात आले. हा बिबट्या संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातून या परिसरात आला असावा, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. मात्र, भरवस्तीत बिबट्या आढळल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# विमान प्रवाशांसाठी खुशखबर, नवी मुंबई – नागपूरसाठी थेट विमान

**नवी मुंबई (धनश्री सट्टा) :** नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे नुकतेच लोकार्पण झाले असून त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावरील वाढती वाहतूक कोंडी कमी होण्यास मोठी मदत होणार आहे. या पार्श्वभूमीवर नागपूर आणि मुंबईदरम्यान प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी एक महत्त्वाची बातमी समोर आली आहे. येत्या २५ डिसेंबरपासून नवी मुंबई विमानतळावरून नागपूरसाठी थेट विमानसेवा सुरू करण्यात येणार आहे.इंडिगो एअरलाइन्सने नाताळच्या दिवसापासून नवी मुंबई ते नागपूर या मार्गावर नियमित विमानसेवा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे नागपूरहून मुंबईला जाणाऱ्या प्रवाशांना आणखी एक पर्याय उपलब्ध होणार आहे. विशेषतः मुंबई उपनगर, नवी मुंबई आणि मध्य मुंबई परिसरातील प्रवाशांसाठी नवी मुंबई विमानतळ अधिक जवळचे आणि सोयीस्कर ठरणार आहे. यामुळे प्रवाशांचा प्रवासाचा वेळ कमी होणार असून रस्त्यावरील वाहतूक कोंडीपासूनही मोठा दिलासा मिळणार आहे.नागपूर ते नवी मुंबई थेट हवाईसेवेचा सर्वाधिक फायदा विदर्भातील प्रवासी, व्यावसायिक, उद्योजक तसेच विद्यार्थ्यांना होणार आहे. नागपूर हे विदर्भाचे व्यापारी व शैक्षणिक केंद्र असल्याने मुंबईशी असलेली सुलभ हवाई जोडणी या भागाच्या विकासासाठी उपयुक्त ठरणार आहे.




या नव्या कनेक्टिव्हिटीमुळे विदर्भ आणि महाराष्ट्रातील इतर भागांमधील दळणवळण अधिक गतिमान होणार असून व्यापार, पर्यटन आणि रोजगारनिर्मितीला चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# ठाकुर्ली रेल्वे स्थानकात जाण्यासाठी गणेशनगरच्या प्रवाशांचा चोळे पॉवर हाऊसमधून मधला मार्ग

**डोंबिवली (प्रथमेश चव्हाण) :** डोंबिवली पश्चिमेतील रेल्वे मैदान, गणेशनगर परिसरातील अनेक गृहसंकुलांमधील नोकरदार सकाळच्या वेळेत चोळे पॉवर हाऊसमधील रेल्वे कारशेड, भाजीपाला मळ्यांच्या बाजुने थेट ठाकुर्ली रेल्वे स्थानकात येत आहे. यामुळे सकाळच्या वेळेत चालणे होते आणि रिक्षा भाड्याची बचत होत असल्याने बावनचाळ रेल्वे मैदान, गणेशनगर परिसरातील अनेक प्रवासी चोळे पॉवरमधील जागेतून ठाकुर्ली रेल्वे स्थानक गाठणे पसंत करत आहेत.



डोंबिवली रेल्वे स्थानकातून गणेशनगर, रेल्वे मैदान भागात येण्यासाठी प्रवाशांना शेअर पध्दतीने १५ ते २० रूपये भाडे मोजावे लागते. एकट्याने प्रवास केला तर रिक्षा चालक ६० ते ७० रूपये भाडे सांगतो. डोंबिवली पश्चिमेतील वाहनांची गर्दी, त्यात वाहतूक कोंडी. त्यामुळे प्रवासी त्रस्त असतात. त्यात गणेशनगर भागात जाण्यासाठी रिक्षा वाहनतळावर येण्यासाठी गर्दीतून वाट काढत यावे लागते.

डोंबिवली रेल्वे स्थानकाजवळील ही सर्व परिस्थिती पाहून गणेशनगर, बावनचाळ रेल्वे मैदान परिसरातील चाळी, गृहसंकुलांमधील कल्याण, ठाणे, मुंबईत परिसरात जाणारा बहुतांशी वर्ग सकाळच्या वेळेत चोळे पॉवर हाऊसमधील पडिक जागेतून रेल्वे कारशेडमधून, भाजीपाला मळ्यांच्या बाजुने ठाकुर्ली रेल्वे स्थानक गाठतो.

घरापासून दहा ते पंधरा मिनिटात ठाकुर्ली रेल्वे स्थानकात जाता येत असल्याने बहुतांशी प्रवासी या मधल्या मार्गाला पसंती देत आहेत. त्यात रिक्षा भाड्याची बचत होते. आणि डोंबिवली रेल्वे स्थानकातील गर्दीतून सुटका होते. ठाकुर्ली रेल्वे स्थानकात प्रवाशांची गर्दी कमी असते.

डोंबिवलीतील अनेक प्रवासी ठाकुर्ली रेल्वे स्थानकाच्या पूर्व, पश्चिम भागातील मोकळ्या जागेत आपल्या दुचाकी उभ्या करून कामाला निघून जातात. संध्याकाळी कामावरून परतल्यावर दुचाकीने घरी परत येतात. रात्रीच्या वेळेत ठाकुर्ली रेल्वे स्थानक परिसरात, बावनचाळ, चोळे पॉवर हाऊस भागात मिट्ट काळोख असतो. त्यामुळे प्रवासी रात्रीच्या वेळेत या भागातून येणे टाळतात. हे प्रवासी रस्ते मार्गाने घर गाठतात.

ठाकुर्ली पश्चिम चोळे पॉवर हाऊस भागात ठाकुर्ली रेल्वे स्थानक ते गणेशनगर परिसरात स्कायवॉकची उभारणी केली तर डोंबिवली पश्चिमेतील बहुतांशी प्रवासी या भागातून येजा करील, असे प्रवासी सांगतात. रेल्वे आणि पालिका प्रशासनाने यासाठी पुढाकार घ्यावा, अशी प्रवाशांची मागणी आहे.

# नवी मुंबई विमानतळ नामकरणासाठी पुन्हा संघर्ष, २२ डिसेंबरला विमानतळावर जनाक्रोश दिंडी मोर्चा

**नवी मुंबई (भावना जैन) :** नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला राष्ट्रीय नेते, माजी खासदार दि. बा. पाटील यांचे नाव देण्याबाबत घोषणा करा, या मागणीसाठी २२ डिसेंबर रोजी सर्वपक्षीय समितीच्या नेतृत्वाखाली नवी मुंबई विमानतळावर जनाक्रोश दिंडी मोर्चा काढण्यात येणार आहे. या संदर्भात सर्वपक्षीय नामकरण समितीची बैठक झाली असून भिवंडीचे खासदार सुरेश म्हात्रे यांनी सर्वपक्षीय समितीला या मोर्चाचे नेतृत्व करण्याची विनंती केली होती. त्यानुसार या आंदोलनाचे नेतृत्व समिती करणार असल्याची माहिती दि. बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ नामकरण समितीचे अध्यक्ष दशरथ पाटील यांनी दिली आहे.



२५ डिसेंबरपासून नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सुरू होत आहे. त्यामुळे नवी मुंबई विमानतळाच्या नामकरणासाठी पुन्हा एकदा संघर्ष होण्याची चिन्हे निर्माण झाली आहेत. नवी मुंबई विमानतळाचे उद्घाटन होऊनही नाव देण्यासंदर्भात सरकार करीत असलेल्या दिरंगाईमुळे भूमिपुत्रांमध्ये असंतोष पसरत आहे. दिल्ली येथे सुरू झालेल्या संसदेच्या हिवाळी अधिवेशनात भिवंडीचे खासदार सुरेश म्हात्रे यांनी पुन्हा एकदा नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला माजी खासदार दिबा पाटील यांचे नाव देण्याची जोरदार मागणी केली आहे. तर उद्घाटनानंतर लागलीच भूमिपुत्रांनी विमानतळाला केवळ दिबांचे नाव अशी घोषणा देत एकप्रकारे संघर्षाचे बिगूल फुंकले होते.

२५ डिसेंबरपासून नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ कार्यान्वित होत आहे. त्या वेळी या विमानतळाला भूमिपुत्र, बहुजनांचे राष्ट्रीय नेते माजी खासदार दि. बा. पाटील यांचे नाव लागण्याची ही शेवटची संधी आहे. त्यामुळे एक दिवस समाजासाठी एक दिवस दिबांसाठी असा जोरदार प्रचार तरुणांमध्ये केला जात आहे.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला नाव मिळावे यासाठी रायगड, ठाणे, मुंबई व पालघर या जिल्ह्यांतील स्थानिक भूमिपुत्रांनी २०२१ पासून संघर्ष सुरू करीत सरकारचे लक्ष वेधून घेण्याचा प्रयत्न केला. यासाठी लाखो भूमिपुत्रांनी रस्त्यावर उतरून संघर्ष केला आहे. त्यातूनच केंद्र व राज्य सरकारने विमानतळाला दिबांचे नाव देण्यासाठी सहमती दर्शविली आहे. यासाठी वारंवार झालेल्या बैठकीत आश्वासने दिली आहेत. मात्र उद्घाटन पार पडल्यानंतरही विमानतळ नामकरणाचे आश्वासन पूर्ण होण्याची चिन्हे पुन्हा एकदा धूसर होऊ लागल्याने येथील नागरिक संतप्त झाला आहे. त्याने सरकार, राजकीय नेते आणि लोकप्रतिनिधी यांना समाजमाध्यमातून प्रश्न विचारण्यास सुरुवात केली आहे.

# ठाणेकरांनो लक्ष द्या; पाणीपुरवठा सुरळीत होण्यासाठी दोन दिवस लागणार

**ठाणे (विशाल पाटील) :** ठाणे महापालिकेच्या स्वतःच्या योजनेतील जलवाहिनी दुरुस्तीचे काम बुधवारी रात्री पूर्ण झाल्यानंतर गुरुवारी सकाळपासून शहरात पाणीपुरवठा पुन्हा सुरू करण्यात आला. गेले १५ दिवस लागू असलेल्या पाणी कपातीमुळे पुरवठ्याचे वेळापत्रक विस्कळीत झाले असून ते पूर्ववत होण्यासाठी आणखी दोन दिवस लागण्याची शक्यता पालिका प्रशासनाने व्यक्त केली आहे. कल्याण फाटा परिसरात महानगर गॅस कंपनीच्या कामादरम्यान महापालिकेची जुनी प्री-स्ट्रेस काँक्रीट जलवाहिनी फुटली होती. जलवाहिनी जुनी असल्याने दुरुस्तीसाठी पाच दिवस लागले. मात्र दुरुस्ती पूर्ण झाल्यानंतर पाणीपुरवठा सुरू करताच जलवाहिनी आणखी तीन ठिकाणी फुटल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे पालिकेने १९ डिसेंबरपर्यंत ५० टक्के पाणी कपात लागू करत पुन्हा दुरुस्तीचे काम हाती घेतले.या कालावधीत शहरात तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली. अनेक गृहसंकुलांच्या टाक्या रिकाम्या झाल्या, तर महापालिकेच्या साठवण टाक्यांमधील पाणीसाठाही कमी झाला. ठाणे शहर आणि घोडबंदर परिसरात टँकरच्या मागणीत मोठी वाढ झाली. काही ठिकाणी पालिकेकडून टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात आला असला तरी मागणीच्या तुलनेत टँकर अपुरे पडले. खासगी टँकरचालकांकडून १० हजार लिटर पाण्यासाठी तीन हजार रुपयांपेक्षा अधिक, तर काही ठिकाणी आठ ते नऊ हजार रुपयांची मागणी होत असल्याच्या तक्रारी नागरिकांनी केल्या. दरम्यान, जलवाहिनीची दुरुस्ती दिवसरात्र पालिकेच्या पथकांकडून सुरू होती. अखेर काम पूर्ण झाल्यानंतर शहरात पाणीपुरवठा सुरू केला. मात्र अनेक संकुलांच्या तसेच महापालिकेच्या साठवण टाक्या रिकाम्या असल्याने त्या भरून पुरवठ्याचे वेळापत्रक पूर्ववत होण्यासाठी आणखी दोन दिवस लागतील.त्याचप्रमाणे मो. ह महाविद्यालय येथे २२ ते २४ डिसेंबर या कालावधीत मोहोर, क्रिडा स्पर्धा, आनंद मेळावा, शैक्षणिक बक्षीस समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे.

# ठाण्यात अल्पसंख्यांक हक्क दिन साजरा

**ठाणे (रोहित जैसवार) :** संयुक्त राष्ट्र संघटनेने १८ डिसेंबर १९९२ रोजी राष्ट्रीय, वांशिक, धार्मिक व भाषिक अल्पसंख्यांकांच्या हक्कांचा जाहीरनामा स्वीकारला. त्या अनुषंगाने दरवर्षी १८ डिसेंबर हा दिवस अल्पसंख्यांक हक्क दिन म्हणून साजरा केला जातो. अल्पसंख्यांक समाजाला त्यांच्या घटनात्मक व कायदेशीर हक्कांची माहिती मिळावी, या उद्देशाने अल्पसंख्यांक विकास विभाग व जिल्हा नियोजन समिती यांच्या वतीने ठाणे जिल्हा नियोजन भवनाच्या सभागृहात अल्पसंख्यांक हक्क दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाला जिल्हा नियोजन अधिकारी वैभव कुलकर्णी आणि जिल्हा माहिती अधिकारी मनोज सुमन शिवाजी सानप हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. या कार्यक्रमास जिल्हा महिला व बाल विकास विभागाच्या जिल्हा परिविक्षा अधिकारी श्रीमती विवियन सिल्व्हर, पोलीस अधीक्षक विलास कदम, सहायक जिल्हा नियोजन अधिकारी निवेदिता पाटील, सहायक जिल्हा नियोजन अधिकारी (मानव विकास) दिपाली भोये यांची उपस्थिती होती. तसेच रेडियन्ट इंग्लिश हायस्कूल व कनिष्ठ विद्यालयाचे सय्यद मोहसीन रिझवी मोहम्मद, इमाम बिरादर, न्यू इंडियन इंग्लिश हायस्कूल, श्रीलंका देवरीपाडा, कौसा–मुंब्राच्या हसीना अब्दुल चौधरी, सेंट जॉन बाप्टीस्ट हायस्कूल, ठाणेच्या कविता चौधरी यांच्यासह मार्गदर्शक, अल्पसंख्यांक समाजातील नागरिक तसेच ठाणे व मुंब्रा परिसरातील विविध शाळांचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



यावेळी जिल्हा नियोजन अधिकारी वैभव कुलकर्णी यांनी अल्पसंख्यांक हक्क दिनाबाबत सविस्तर माहिती देताना भारतातील विविधतेतील एकता या संकल्पनेवर भर दिला. भारतीय राज्यघटनेतील कलम २९ व ३० अंतर्गत अल्पसंख्यांकांसाठी महत्त्वाच्या तरतुदी करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. अल्पसंख्यांक समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी तसेच त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी शासन विविध योजना व उपक्रम राबवित असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. जिल्हा माहिती अधिकारी मनोज शिवाजी सानप यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी उपयुक्त ठरणारे प्रेरणादायी भाषण केले. रेडियन्ट इंग्लिश हायस्कूल व कनिष्ठ विद्यालयाचे सय्यद मोहसीन रिझवी मोहम्मद यांनी भारतासाठी अमेरिकेच्या टॅरिफ आव्हानांचे संधीमध्ये रूपांतर या विषयावर माहितीपूर्ण मांडणी केली. तसेच इमाम बिरादर यांनी अल्पसंख्यांक हक्क या विषयावर उपस्थितांना मार्गदर्शन केले.

# संविधान दिनानिमित्त समतादूत मार्फत विविध कार्यक्रमांचे आयोजन

**ठाणे (सम्यक कासारे) :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, (बार्टी ) पुणे यांच्यामार्फत संविधान दिनानिमित्त ठाणे जिल्हयामध्ये समतादूत मार्फत संविधान सप्ताह साजरा केला जात आहे. उद्घाटन समारोह दि.२६ नोव्हेंबर रोजी संविधान रॅली व उद्देशिका वाचन करून संपन्न झाला. तसेच विविध स्पर्धा, (निबंध, वक्तृत्व प्रश्नमंजुषा, प्रबोधन), पथनाट्यद्वारे संविधान मधील कलम, संविधानाचे महत्व, आपले हक्क, कर्तव्य यावर माहितीपर कार्यक्रम असे २ डिसेंबर पर्यंत सप्ताह साजरा होणार आहे.



हा कार्यक्रम महासंचालक सुनील वारे, निबंधक विशाल लोंढे, विभाग प्रमुख डॉ.बबन जोगदंड यांच्या मार्गदर्शनाखाली राबविला जात आहे, अशी माहिती बार्टीच्या ठाणे जिल्हा प्रकल्प अधिकारी मेघा मनोज पवार यांनी दिली आहे.संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त सामाजिक न्याय विभागाच्या वतीने राज्यभर विविध उपक्रम राबविले जात आहेत. त्याच उपक्रमाचा एक एक भाग म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी ), पुणे यांच्या विद्यमाने संपूर्ण जिल्ह्यात २६ नोव्हेंबर ते २ डिसेंबर २०२५ या कालावधीत आयोजन करण्यात आले आहे. सप्ताहाची सुरुवात २६ नोव्हेंबर रोजी 'वॉक फॉर संविधान' रॅलीने झाली. या उपक्रमात शेणवे विभाग हायस्कूल, शेणवे, विद्या प्रसारक मंडळ शहा सरूपचंद माध्यमिक व कनिष्ठ विद्यालय, किन्हवली, महात्मा ज्योतिबा फुले आश्रम शाळा, आर के अभ्यंग महाविद्यालय, बहुजन हिताय बहुजन सुखाय बुद्ध विहार, मॉडेल स्कुल, नवी मुंबई महानगरपालिका शाळा क्र. २२ या शाळांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. या शैक्षणिक शाळा, महाविद्यालयांमध्ये संविधान उद्देशिका वाचन, अभिवादन, व्याख्यांनाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये संविधान जनजागृती साठी संविधानावर आधारित प्रश्नमंजुषा, निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन, चालता बोलता कार्यक्रम अशा विविध उपक्रमाचे आयोजन संपूर्ण आठवडाभर केले आहे.

# संत गाडगे महाराज यांचे सामाजिक कार्य

**भारतीय समाजाच्या सामाजिक, सांस्कृतिक व नैतिक इतिहासात काही व्यक्तिमत्त्वे अशी आहेत की ज्यांचे कार्य केवळ त्यांच्या काळापुरते मर्यादित न राहता पुढील पिढ्यांना दिशा देणारे ठरते. समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, अस्वच्छता, दारिद्र्य आणि विषमता यांविरुद्ध आपल्या आचरणातून बंड पुकारणारे आणि उपदेशापेक्षा कृतीला अधिक महत्त्व देणारे थोर संत म्हणजे संत गाडगे महाराज होय. २० डिसेंबर रोजी असणाऱ्या त्यांच्या स्मृतीदिनानिमित्त त्यांच्या सामाजिक कार्याचा मागोवा घेताना असे लक्षात येते की गाडगे महाराज हे केवळ कीर्तनकार किंवा संत नव्हते, तर ते एका व्यापक अर्थाने समाजसुधारक, लोकशिक्षक आणि परिवर्तनवादी विचारवंत होते. त्यांनी आपल्या संपूर्ण आयुष्याचा उपयोग समाजातील शेवटच्या घटकापर्यंत माणुसकी, स्वच्छता, शिक्षण आणि सामाजिक समतेचा संदेश पोहोचवण्यासाठी केला.**

गाडगे महाराजांचा जन्म एका अत्यंत साध्या, गरीब कुटुंबात झाला. बालपणापासूनच त्यांनी दारिद्र्य, उपेक्षा आणि सामाजिक विषमतेचे वास्तव जवळून अनुभवले. या अनुभवांनी त्यांच्या मनात समाजाबद्दल करुणा आणि अस्वस्थता निर्माण केली. समाजातील दुःख, अज्ञान आणि अस्वच्छता ही केवळ दैवाची देणगी नसून मानवी निष्काळजीपणा, अज्ञान आणि शोषणाची परिणती आहे, ही जाणीव त्यांना लवकरच झाली. म्हणूनच त्यांनी देव, धर्म आणि अध्यात्म याकडे पाहण्याची पारंपरिक चौकट नाकारून माणूस, समाज आणि नैतिक कर्तव्य यांना केंद्रस्थानी ठेवले. त्यांच्या मते, देवाची खरी पूजा म्हणजे माणसाची सेवा आणि समाजहिताचे कार्य होय.

संत गाडगे महाराजांच्या सामाजिक कार्याचा पाया त्यांच्या स्वच्छतेच्या विचारात दिसून येतो. स्वच्छता हा केवळ आरोग्याचा विषय नसून तो सामाजिक शिस्तीचा, आत्मसन्मानाचा आणि सभ्यतेचा निर्देशक आहे, असे त्यांचे ठाम मत होते. गावोगावी कीर्तनासाठी जात असताना ते सर्वप्रथम हातात झाडू घेऊन रस्ते, चौक, धर्मशाळा आणि सार्वजनिक ठिकाणे स्वच्छ करत. ही कृती केवळ साफसफाईपुरती मर्यादित नव्हती, तर ती समाजाला दिलेला मौनातील संदेश होता. 'स्वच्छता म्हणजे धर्म' हा विचार त्यांनी शब्दांत नव्हे, तर प्रत्यक्ष कृतीतून रुजवला. लोकांना उपदेश करण्यापेक्षा त्यांनी स्वतः झाडू हातात घेतल्याने समाजमनावर त्याचा खोल परिणाम झाला. स्वच्छतेकडे दुर्लक्ष करणाऱ्या समाजाला त्यांनी आरसा दाखवला.

त्यांच्या कार्यातील आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे अंधश्रद्धा निर्मूलन. तत्कालीन समाजात देव-धर्माच्या नावाखाली अनेक गैरप्रथा, कर्मकांड आणि अंधश्रद्धा प्रचलित होत्या. गाडगे महाराजांनी यांना थेट आव्हान दिले. देवळात घंटा वाजवून, नारळ फोडून किंवा महागड्या पूजा करून समाजाचे भले होत नाही, तर शिक्षण, स्वच्छता, आरोग्य आणि मानवसेवा यातूनच समाज उन्नत होतो, असे ते ठामपणे सांगत. त्यांच्या कीर्तनांतून त्यांनी अंधश्रद्धेवर कठोर प्रहार केला. त्यांच्या भाषेत साधेपणा होता, पण आशयात प्रखर सामाजिक जाण होती. त्यामुळे त्यांच्या शब्दांचा प्रभाव ग्रामीण समाजावर विशेषतः मोठ्या प्रमाणात पडला.

शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे सर्वात प्रभावी साधन आहे, याची जाणीव गाडगे महाराजांना होती. शिक्षणाविना समाज अज्ञानाच्या अंधारात राहतो आणि शोषणाला बळी पडतो, हे त्यांनी ओळखले होते. म्हणूनच त्यांनी शिक्षणासाठी निधी उभारण्याचे कार्य सुरू केले. कीर्तनातून मिळालेला पैसा त्यांनी स्वतःसाठी कधीही वापरला नाही. हा पैसा त्यांनी शाळा, वसतिगृहे, धर्मशाळा आणि समाजोपयोगी संस्थांसाठी दिला. विशेषतः गरीब, दलित आणि वंचित समाजातील मुलांना शिक्षणाची संधी मिळावी, यासाठी त्यांनी मोठे योगदान दिले. शिक्षण म्हणजे केवळ अक्षरओळख नव्हे, तर माणूस म्हणून जगण्याची कला आहे, असा त्यांचा विश्वास होता.

गाडगे महाराजांच्या सामाजिक कार्यात जातिभेद आणि अस्पृश्यतेविरोधातील लढा अत्यंत महत्त्वाचा ठरतो. त्या काळातील समाज कठोर जातीय विभागणीने ग्रासलेला होता. अस्पृश्यतेमुळे समाजातील मोठा वर्ग मूलभूत मानवी हक्कांपासून वंचित होता. गाडगे महाराजांनी या अन्यायाविरुद्ध निर्भीड भूमिका घेतली. त्यांनी आपल्या कीर्तनांतून आणि कृतीतून जातिभेदाचा निषेध केला. सर्व माणसे समान आहेत आणि त्यांचा सन्मान करणे हेच खरे धर्मकार्य आहे, असा संदेश त्यांनी दिला. त्यांच्या आश्रमांमध्ये आणि धर्मशाळांमध्ये जातपात न पाहता सर्वांना



समान वागणूक दिली जात असे. ही कृती त्या काळातील सामाजिक व्यवस्थेला थेट आव्हान देणारी होती.

दारिद्र्य निर्मूलन आणि गरिबांची सेवा हा गाडगे महाराजांच्या कार्याचा आणखी एक महत्त्वाचा पैलू होता. गरिबी ही केवळ आर्थिक समस्या नसून ती सामाजिक आणि मानसिक गुलामगिरी निर्माण करते, असे त्यांचे मत होते. त्यामुळे गरिबांना मदत करताना केवळ दानधर्म न करता त्यांना स्वावलंबी बनवण्यावर त्यांनी भर दिला. भुकेल्याला अन्न देणे, आजारी व्यक्तीची सेवा करणे आणि संकटात सापडलेल्या माणसाला आधार देणे, हे त्यांना धार्मिक कृत्यापेक्षाही अधिक महत्त्वाचे वाटत होते. त्यांच्या जीवनशैलीतून त्यांनी साधेपणा आणि त्यागाचे उदाहरण घालून दिले.

गाडगे महाराजांचे कीर्तन हे केवळ धार्मिक प्रवचन नव्हते, तर ते एक सामाजिक व्यासपीठ होते. त्यांच्या कीर्तनांतून त्यांनी समाजातील प्रश्न मांडले, अन्यायावर टीका केली आणि परिवर्तनाची गरज अधोरेखित केली. त्यांच्या भाषेत ग्रामीण बोलीचा सहजपणा होता, त्यामुळे सामान्य माणसाला ते आपलेसे वाटत. त्यांनी कधीही अवघड तात्त्विक संकल्पना मांडल्या नाहीत, पण साध्या उदाहरणांतून त्यांनी खोल सामाजिक सत्ये उलगडली. त्यामुळे त्यांच्या कीर्तनांना मोठ्या प्रमाणावर लोक उपस्थित राहत आणि त्यांच्या विचारांचा प्रसार होत असे.

स्त्री-सन्मान आणि स्त्रियांच्या स्थितीबाबतही गाडगे महाराजांची भूमिका प्रगत होती. त्या काळात स्त्रियांना शिक्षण, स्वातंत्र्य आणि सामाजिक सन्मान नाकारला जात होता. गाडगे महाराजांनी स्त्रियांकडे केवळ करुणेने नव्हे, तर समानतेच्या दृष्टीने पाहिले. स्त्री ही समाजाची अर्धी शक्ती आहे आणि तिच्या उन्नतीशिवाय समाजाचा विकास शक्य नाही, असा विचार त्यांनी मांडला. त्यांनी स्त्रीशिक्षणाला पाठिंबा दिला आणि स्त्रियांवरील अन्यायाविरुद्ध आवाज उठवला.

संत गाडगे महाराजांच्या कार्यात धर्माची व्याख्या अत्यंत मानवी स्वरूपाची होती. त्यांच्या मते, धर्म म्हणजे मंदिर, मशीद किंवा चर्चपुरता मर्यादित नसून तो माणसाच्या आचरणात दिसून यायला हवा. स्वच्छता, प्रामाणिकपणा, करुणा, समानता आणि सेवाभाव हेच खरे धार्मिक मूल्ये आहेत. त्यांनी कर्मकांड, दिखावा आणि अंधश्रद्धेच्या नावाखाली चालणाऱ्या शोषणाचा तीव्र निषेध केला. त्यामुळे काही वेळा त्यांना विरोधालाही सामोरे जावे लागले, पण त्यांनी कधीही आपल्या विचारांशी तडजोड केली नाही.

गाडगे महाराजांच्या सामाजिक कार्याचा प्रभाव त्यांच्या काळापुरता मर्यादित राहिला नाही. त्यांच्या विचारांनी पुढील अनेक समाजसुधारक, कार्यकर्ते आणि चळवळींना प्रेरणा दिली. स्वच्छतेचा संदेश, शिक्षणाचे महत्त्व, अंधश्रद्धेविरोधी भूमिका आणि सामाजिक समतेचा आग्रह हे सर्व विचार आजही तितकेच महत्त्वाचे आहेत. आजच्या काळातही समाज अस्वच्छता, अंधश्रद्धा, विषमता आणि नैतिक अधःपतन अशा समस्यांनी ग्रासलेला आहे. अशा परिस्थितीत गाडगे महाराजांचे विचार अधिकच समर्पक वाटतात.

समकालीन समाजात गाडगे महाराजांच्या विचारांचे पुनर्मूल्यांकन करण्याची गरज आहे. स्वच्छ भारत अभियान, सामाजिक समता, शिक्षण सर्वांसाठी आणि अंधश्रद्धा निर्मूलन यांसारख्या उपक्रमांना गाडगे महाराजांच्या विचारांची वैचारिक बैठक लाभू शकते. त्यांनी दाखवलेला मार्ग म्हणजे केवळ सरकारी योजना किंवा कायदे नव्हेत, तर प्रत्येक नागरिकाने आपल्या आचरणातून समाजहित साधण्याचा मार्ग आहे. हातात झाडू घेऊन स्वच्छता करणे, गरजूला मदत करणे, शिक्षणाला प्रोत्साहन देणे आणि अंधश्रद्धेला प्रश्न विचारणे हीच गाडगे महाराजांना खरी श्रद्धांजली ठरू शकते.

संत गाडगे महाराजांच्या जीवनाकडे पाहिले तर असे लक्षात येते की त्यांनी कधीही प्रसिद्धी, सत्ता किंवा संपत्तीचा पाठलाग केला नाही. त्यांचे संपूर्ण आयुष्य सेवाभाव, त्याग आणि सामाजिक बांधिलकीचे प्रतीक होते. त्यांनी समाजाला उपदेश केला नाही, तर स्वतः उदाहरण घालून दिले. म्हणूनच ते केवळ संत नव्हते, तर ते एक जिवंत सामाजिक चळवळ होते. त्यांच्या स्मृतीदिनानिमित्त त्यांच्या सामाजिक कार्याचा स्मरण करताना आपल्यालाही आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे, आपण समाजासाठी काय करत आहोत, हा प्रश्न स्वतःला विचारण्याची हीच योग्य वेळ आहे.

अशा या थोर समाजसुधारकाच्या स्मृतीला वंदन करताना एवढेच म्हणावेसे वाटते की संत गाडगे महाराजांचे विचार हे काळाच्या पुढे जाणारे होते. त्यांनी दाखवलेला मानवतेचा, समतेचा आणि सेवाभावाचा मार्ग आजही तितकाच प्रकाशमान आहे. समाजातील प्रत्येक घटकाने त्यांच्या विचारांतून प्रेरणा घेतली, तर खऱ्या अर्थाने सामाजिक परिवर्तन घडू शकेल. त्यांच्या स्मृतीदिनानिमित्त त्यांच्या कार्याचे स्मरण करणे म्हणजे केवळ भूतकाळाची उजळणी नव्हे, तर वर्तमान आणि भविष्य घडवण्याची प्रेरणा घेणे होय.

**- डॉ. राजेंद्र बगाटे (लेखक समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**

# ओबेन इलेक्ट्रिकने प्री-सिरीज बी राउंडमध्ये ८५ कोटी रुपये उभारले

भारतातील स्वदेशी आणि संशोधन आणि विकास-चालित इलेक्ट्रिक मोटरसायकल उत्पादक ओबेन इलेक्ट्रिकने (Oben Electric) आज त्यांच्या प्री-सिरीज बी फेरीत ८५ कोटी रुपयांच्या यशस्वी उभारणीची घोषणा केली. या फेरीत राज के सोईन, मुसा डाकरी, रमेश भुतडा आणि इतर विद्यमान गुंतवणूकदारांसह अनेक प्रसिद्ध भारतीय अमेरिकन कुटुंब कार्यालयांचा सहभाग होता. या निधी उभारणीतून ओबेन इलेक्ट्रिकची दूरदृष्टी, अभियांत्रिकी खोली, बाजारपेठेतील आकर्षण आणि ग्राहकांच्या विश्वासावरील गुंतवणूकदारांचा दृढ विश्वास प्रतिबिंबित होतो, जो गेल्या १२ महिन्यांत त्यांच्या १० पट महसूल वाढीद्वारे दिसून येतो.

ही गुंतवणूक एका महत्त्वाच्या क्षणी आली आहे, कारण कंपनी आर्थिक वर्ष २६ मध्ये १०० कोटी रुपयांचा महसूल गाठण्यासाठी सज्ज आहे आणि मार्च २०२६ पर्यंत सीओजीएस ब्रेक-इव्हन करेल, जे मजबूत संचालन शिस्तीचे संकेत देते. कंपनीने २०२७ पर्यंत ईबीआयटीडीए ब्रेक इव्हनचे लक्ष्य ठेवले आहे, कारण कंपनी मार्च २०२६ पर्यंत १५० विशेष शोरूम आणि सेवा केंद्रांपर्यंत पोहोचेल आणि ग्राहकांच्या प्रमाणीकरणामुळे आणि डीलरशिपच्या मजबूत आवडीमुळे पुढील २ वर्षांत ५०० शोरूमपर्यंत पोहोचेल. कंपनीला अजूनही डीलर्सचा मजबूत विश्वास दिसत आहे, जो उच्च-गुणवत्तेच्या डीलरशिप अर्जांमध्ये दिसून येतो, विद्यमान डीलर्स नफा मिळवत असताना, त्यांची पुन्हा एकदा आवड दिसून येते. नवीन भांडवल, ओबेन इलेक्ट्रिकच्या वितरण नेटवर्कचा विस्तार करून आणि ब्रँड जागरूकता वाढवून त्याच्या वाढीच्या पुढील टप्प्याला चालना देईल. त्याचबरोबर, कंपनी नवीन उत्पादन विकास आणि उत्पादन लाँचिंगला गती देईल.

सखोल उभ्या एकात्मिकतेच्या पायावर बांधलेल्या, ओबेनद्वारे इलेक्ट्रिक डिझाइन सुधारणा, उत्पादन कार्यक्षमता वाढवणे आणि दीर्घकालीन शाश्वततेसाठी स्केल मॅन्युफॅक्चरिंगद्वारे त्यांच्या मटेरियलच्या बिलला अधिक ऑप्टिमायझ करण्यावर लक्ष केंद्रित केले जाते. २०२५ मध्ये, ओबेन इलेक्ट्रिकने त्यांचे विक्री चॅनल डिजिटल कॉमर्स प्लॅटफॉर्मवर विस्तारले, ज्यामुळे त्यांच्या मोटारसायकली अमेझॉन आणि फ्लिपकार्टवर उपलब्ध झाल्या आहेत. या उपक्रमामुळे ग्राहकांची सुलभता वाढली आहे आणि रिटेल आणि डिजिटल टचपॉइंटमध्ये मागणी कायम राहण्यास हातभार लागला आहे. ओबेन इलेक्ट्रिक, सध्या १८ पेक्षा अधिक राज्यांमधील ७० पेक्षा अधिक शहरांमध्ये ८५ पेक्षा अधिक शोरूम चालवते.

निधी उभारणीबाबत बोलताना, ओबेन इलेक्ट्रिकचे संस्थापक आणि सीईओ मधुमित अग्रवाल म्हणाले, "ही निधी उभारणी ओबेन इलेक्ट्रिकच्या ऑपरेटिंग गती, भांडवली शिस्त आणि वाढीच्या मार्गदर्शक योजनेवरील गुंतवणूकदारांच्या विश्वासाचे मजबूत प्रमाण आहे. या नवीन निधीमुळे आम्हाला मार्च २०२६ पर्यंत सीओजीएस ब्रेक-इव्हन साध्य करण्यासाठी स्पष्ट दृश्यमानता आणि आत्मविश्वास मिळतो, जो मोठ्या प्रमाणात कार्यरत असलेल्या कोणत्याही ईव्ही ओईएमसाठी एक महत्त्वाचा टप्पा आहे. ग्राहकांच्या वाढत्या प्रमाणीकरणामुळे आणि व्यापाऱ्यांच्या वाढत्या आवडीमुळे आम्ही आमचा वितरण प्रभाव वाढवत असताना, आम्ही २०२७ मध्ये ईबीआयटीडीए ब्रेक-इव्हनकडे प्रगती करण्यास सज्ज आहोत. भारतातील श्रेणी-परिभाषित इलेक्ट्रिक मोटरसायकल कंपनी तयार करताना आम्ही शाश्वत स्केलिंगवर लक्ष केंद्रित करतो."

# रेड वाईन प्यायल्यामुळे हृदय विकाराचा धोका खरचं कमी होतो का?



पुनरावलोकन पेपरमध्ये वाइन कमी प्रमाणात, जेवणासह आणि भूमध्य आहाराचा भाग म्हणून घेतल्यास त्याचे फायदे दिसून आले. तर होय, काही अभ्यासांनी वाइनच्या थोड्या प्रमाणात संभाव्य फायदे दर्शविले आहेत, परंतु हे अगदी विशिष्ट परिस्थितीत होते. काही अभ्यासांनी वाइनच्या कमी प्रमाणात संभाव्य फायदे दर्शविले आहेत, परंतु हे अगदी विशिष्ट परिस्थितीत होते. पण, आपण हे स्पष्टपणे समजून घेतले पाहिजे की सर्व मद्यपान हृदयासाठी चांगले नाही.

तसेच दररोज मद्यपान करणे सुरक्षित नाही. जागतिक आरोग्य संघटनेने असेही म्हटले आहे की अल्कोहोलचे कोणतेही सेवन पूर्णपणे सुरक्षित नाही, कारण अल्कोहोलमुळे कर्करोगाचा धोका कमी प्रमाणात देखील वाढतो. तज्ज्ञांच्या मते, कोणत्याही प्रकारचे अल्कोहोल टाळणे सर्वोत्तम आहे. आपल्या सर्वांना माहित आहे की पिण्याची पद्धत बर्याचदा अनियमित आणि जड असते आणि अल्कोहोल क्वचितच नियंत्रित, जेवण-आधारित मार्गांनी सेवन केले जाते. आपल्या देशात हृदयरोग, मधुमेह आणि यकृताच्या आजाराचा धोका आधीच खूप जास्त आहे. तज्ञ पुढे सांगतात की, समजून घेण्यासारखा आणखी एक महत्त्वाचा घटक म्हणजे अल्कोहोलकडे कधीही हेल्थ सप्लिमेंट म्हणून पाहिले जाऊ नये.

वाइनचा तथाकथित फायदा फारच कमी आहे आणि नियंत्रित परिस्थितीत केवळ मर्यादित लोकांच्या गटालाच लागू होतो. वास्तविक जीवनात, विशेषत: भारतात, अल्कोहोलच्या सेवनामुळे उच्च रक्तदाब, वजन वाढणे, झोपेचा त्रास आणि हृदयाची लय समस्या उद्भवू शकते. या घटकांमुळे होणारे धोके अखेरीस अभ्यासाने शोधलेले कोणतेही लहान फायदे काढून टाकतील. लोकांना हे समजणे आवश्यक आहे की वाइनमध्ये फायदेशीर संयुगे असतात जे द्राक्षे आणि बेरी, शेंगदाणे, फळे आणि भाज्यांसह इतर पदार्थांद्वारे देखील घेतले जाऊ शकतात. नियमित चालणे आणि घरी शिजवलेले जेवण, तणाव व्यवस्थापन आणि योग्य झोप यामुळे हृदयाला कोणत्याही पेयपेक्षा अधिक चांगले संरक्षण मिळते.

# जिओने कार्यस्थळ कल्याणामध्ये जागतिक मापदंड निर्माण केला

## जगातील सर्वात मोठ्या ऑनलाइन कॉर्पोरेट योग कार्यक्रमात ५२,९१३ सहभागी

रिलायन्स जिओने एका एकाच संस्थेद्वारे आयोजित करण्यात आलेल्या जगातील सर्वात मोठ्या ऑनलाइन कॉर्पोरेट योग कार्यक्रमात ५२,९१३ हून अधिक कर्मचाऱ्यांना एकत्र आणत जागतिक विक्रम प्रस्थापित केला आहे. हा सत्र हॅबिल्डच्या सहकार्याने आयोजित करण्यात आला असून, कार्यस्थळ कल्याणाच्या दृष्टीने हा एक ऐतिहासिक टप्पा आहे आणि याला वर्ल्ड रेकॉर्ड्स युनियनकडून अधिकृत मान्यता मिळाली आहे.

ही कामगिरी कर्मचारी कल्याणाला आपल्या संस्कृतीच्या केंद्रस्थानी ठेवण्याबाबत रिलायन्सची बांधिलकी दर्शवते. गेल्या एका वर्षात, संस्थेने मानसिक आरोग्य, लवचिकता, सर्वांगीण कल्याण आणि शाश्वत उत्पादकतेला पाठबळ देणाऱ्या उपक्रमांना सक्रियपणे प्रोत्साहन दिले आहे. हा विक्रम प्रस्थापित करणारा सत्र रिलायन्सच्या या विश्वासाला बळकटी देतो की लहान पण सातत्यपूर्ण सवयी देखील कर्मचारी दररोज कसे वाटतात आणि कसे काम करतात यामध्ये मोठा फरक घडवू शकतात.

जिओचे सीएचआरओ राहुल मुखर्जी म्हणाले, "रिलायन्समध्ये आमच्यासाठी ही पुढाकार कधीच केवळ एका कार्यक्रमापुरती मर्यादित नव्हती, तर कार्यस्थळावर कल्याण अधिक मजबूत करण्यासाठी होती. जेव्हा कर्मचारी अधिक निरोगी, मानसिकदृष्ट्या केंद्रित आणि भावनिकदृष्ट्या समर्थित वाटतात, तेव्हा त्यांचे एकूण कल्याण, उत्पादकता, लक्ष केंद्रीत करण्याची क्षमता आणि सर्जनशीलता आपोआप वाढते. हा जागतिक विक्रम आमच्या या विश्वासाचे प्रतीक आहे की कल्याण हा समृद्ध कार्यस्थळाचा मूलभूत भाग आहे."




हॅबिल्डचे सह-संस्थापक आणि योग शिक्षक सौरभ बोथरा यांनी सांगितले, "आपण आपला बहुतेक वेळ कामावर घालवतो आणि जेव्हा आपण आपल्या सर्वोत्तम अवस्थेत नसतो, तेव्हा त्याचा परिणाम आपल्या ऊर्जेत, कल्पनांमध्ये आणि टीमवर्कमध्ये दिसून येतो. कार्यस्थळावरील कल्याण आता लक्झरी राहिलेले नाही; ती एक मूलभूत गरज आहे. मला समजते की वेळ काढणे कठीण असते, पण २४ तासांपैकी केवळ २ ते ५ मिनिटे थोड्या हालचालींसाठी दिली तरीही अर्थपूर्ण बदल घडवू शकतात. जेव्हा तुम्ही चांगले वाटता, तेव्हा तुम्ही वेगळ्या पद्धतीने स्वतःला सादर करता, अधिक स्पष्टपणे विचार करता, चांगल्या प्रकारे जोडता आणि अधिक स्थिर राहता. रिलायन्सने हा बदल अनुभवला आहे कारण त्यांनी कल्याणाला प्राधान्य देण्याचा निर्णय घेतला, आणि आम्ही त्यात छोटासा सहभाग देऊ शकलो याचा मला खूप आनंद आहे."

या व्हर्च्युअल सत्रामध्ये साध्या हालचाली, श्वसनक्रिया आणि माइंडफुलनेस तंत्रांचा समावेश होता, ज्यांचे कर्मचारी कुठूनही पालन करू शकत होते. हे व्यस्त कामकाजाच्या दिवसांमध्ये सहजपणे बसणारे असूनही अर्थपूर्ण परिणाम देण्यासाठी डिझाइन करण्यात आले होते. प्रचंड सहभागामुळे हे स्पष्ट होते की तंत्रज्ञान-सक्षम लवचिकता मोठ्या प्रमाणावर कल्याण सुलभ करू शकते.

या जागतिक विक्रमासह, जिओने भारतातील कार्यस्थळ कल्याणासाठी एक नवीन मापदंड निश्चित केला आहे, हे सिद्ध करत की मोठ्या संस्था आपल्या कर्मचाऱ्यांच्या आरोग्य, आनंद आणि दीर्घकालीन उत्पादकतेचे प्रभावीपणे समर्थन करू शकतात.

# स्वदेशी सर्जिकल रोबोट एसएसआय मंत्रासाठी एफडीए ५१०(के) अर्ज दाखल

भारतातील स्वदेशी सर्जिकल रोबोटिक्स क्षेत्रातील अग्रणी कंपनी एसएस इनोवेशन्स इंटरनॅशनल, आयएनसी. (नॅस्डॅक: एसएसआयआय) ने आज एक ऐतिहासिक टप्पा गाठल्याची घोषणा केली. कंपनीने आपल्या नेक्स्ट-जनरेशन एसएसआय मंत्रा सर्जिकल रोबोटिक सिस्टीमसाठी अमेरिकेच्या अन्न व औषध प्रशासनाकडे (एफडीए) ५१०(के) प्रीमार्केट नोटिफिकेशन सादर केले आहे. हे सबमिशन ५ डिसेंबर २०२५ रोजी पूर्ण झाले असून, यामध्ये जनरल सर्जरी, युरोलॉजी, कोलोरेक्टल, गायनॅकोलॉजी आणि कार्डियक अशा उच्च मागणी असलेल्या शस्त्रक्रिया विशेषतांचा समावेश आहे.

हा टप्पा भारतीय विकसित सर्जिकल रोबोटिक प्लॅटफॉर्मने उचललेला आतापर्यंतचा सर्वात महत्त्वाचा जागतिक नियामक टप्पा मानला जात असून, दीर्घकाळ आंतरराष्ट्रीय कंपन्यांच्या वर्चस्वाखाली असलेल्या या क्षेत्रात भारताला ठळक स्थान मिळवून देणारा आहे.

एसएस इनोवेशन्सचे संस्थापक, अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुधीर श्रीवास्तव म्हणाले, "एफडीएकडे ५१०(के) नोटिफिकेशन सादर करणे हे केवळ एसएस इनोवेशन्ससाठीच नव्हे, तर प्रगत वैद्यकीय तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात भारताच्या जागतिक नेतृत्वाच्या उदयासाठीही एक निर्णायक क्षण आहे. एसएसआय मंत्रा ही प्रणाली परवडणारी, सुलभ आणि तांत्रिकदृष्ट्या वेगळी असावी या उद्देशाने विकसित करण्यात आली आहे. विविध भौगोलिक भागांतील तिची सिद्ध कामगिरी तिच्या क्षमतेची साक्ष देते. विशेषतः वंचित समुदायांना सेवा देणाऱ्या रुग्णालयांना जागतिक दर्जाचा आणि किफायतशीर असा पर्याय यामुळे मोठ्या प्रमाणावर लाभदायक




ठरेल, असा आम्हाला विश्वास आहे."

एफडीएसोबत झालेल्या प्री-सबमिशन बैठका आणि सविस्तर चर्चेनंतर, कंपनीने डी नोवो अर्जाऐवजी ५१०(के) मार्ग स्वीकारण्याचा निर्णय घेतला, ज्यामुळे तुलनेने जलद आणि कार्यक्षम मंजुरी प्रक्रियेचा लाभ मिळू शकतो. एफडीए कडून ५१०(के) सबमिशनसाठी लक्ष्य पुनरावलोकन कालावधी ९०दिवसांचा असतो, मात्र एकूण पुनरावलोकन कालावधी बदलू शकतो. याचबरोबर, एसएस इनोवेशन्स युरोपियन युनियनमध्ये सीई मार्किंग मिळविण्याच्या दिशेनेही प्रगती करत असून, त्याची अपेक्षा २०२६ च्या पहिल्या सहामाहीत आहे. यामुळे "मेड-इन-इंडिया" प्लॅटफॉर्मची जागतिक उपस्थिती अधिक वेगाने वाढणार आहे.

३० नोव्हेंबर २०२५ पर्यंत, एसएसआय मंत्रा ने आपल्या तांत्रिक क्षमता आणि जागतिक स्वीकार्यतेचे ठोस प्रतिबिंब दाखवले आहे. कंपनीने आठ देशांमध्ये एकूण १३८ प्रणालींची स्थापना केली असून, त्या १३७ रुग्णालयांमध्ये सक्रियपणे वापरात आहेत. या स्वदेशी सर्जिकल रोबोटिक प्रणालीच्या माध्यमातून आतापर्यंत ७,३०० पेक्षा अधिक शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पडल्या असून, त्यामध्ये ८८ टेली-सर्जरींचा समावेश आहे. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे, या प्रक्रियांपैकी 390 कार्डियक शस्त्रक्रिया करण्यात आल्या असून, हा प्रकार रोबोटिक सर्जरीमधील सर्वात तांत्रिकदृष्ट्या आव्हानात्मक क्षेत्रांपैकी एक मानला जातो, ज्यामुळे एसएसआय मंत्रा ची प्रगत कार्यक्षमता आणि विश्वसनीयता अधोरेखित होते.

एसएसआय मंत्रा ला मिळणारी स्वीकृती आणि त्याची कामगिरी ही स्वदेशी भारतीय मेडिकल रोबोटिक्स इकोसिस्टिमवर वाढत चाललेल्या जागतिक विश्वासाचे द्योतक असून, भारताच्या मेडटेक उद्योगासाठी हा एक महत्त्वाचा टर्निंग पॉईंट अधोरेखित करते.

# उबदार राहा, तंदुरुस्त राहा : वोक्हार्ट हॉस्पिटल नागपूरने हिवाळ्यातील पौष्टिक आहाराचे महत्त्व सांगितले"

**स्वाती अवस्थी, मुख्य आहारतज्ञ, वोक्हार्ट हॉस्पिटल्स नागपूर**



नागपूर हिवाळा आला की ओठ फाटणे, त्वचा कोरडी पडणे, टाचांना भेगा पडणे असे त्रास वाढतात. रजईत एक तास जास्त गुंडाळून बसण्यासाठी हा सुंदर मोसम असला तरी या काळात सर्दी, खोकला आणि फ्लूची लक्षणे जास्त दिसतात. त्यामुळे लोक बहुतेक वेळ घरातच राहणे पसंत करतात. तसे पाहिले तर हिवाळा हा गरम अन्न पदार्थ, हेल्दी फूड आणि गरम कपड्यांचा काळ आहे. या हंगामात मानवी शरीराची चयापचय आणि उर्जा पातळी बदलते. आपल्या खाण्याच्या सवयींमध्येही बदल जाणवतो. हिवाळ्यात अधिक खाण्याची इच्छा निर्माण होते आणि उबदार वाटण्यासाठी लोक जास्त कॅलरीचे पदार्थ खाण्याकडे वळतात. थंडीत आजारांपासून बचावासाठी शरीराला काही प्रमाणात अतिरिक्त ऊर्जा आवश्यक असली तरी, हवामान हे अस्वस्थ किंवा अयोग्य खाण्याचे कारण ठरू नये. वोक्हार्ट हॉस्पिटल्स, नागपूरने हिवाळ्यात शरीराला उबदार ठेवणाऱ्या आणि आरोग्य मजबूत करणाऱ्या पौष्टिक खाद्यपदार्थांचे महत्त्व अधोरेखित केले आहे. आता आपल्या शरीराच्या पोषणाच्या गरजांकडे लक्ष देण्याची वेळ आली आहे. मजबूत रोगप्रतिकारक शक्ती किती महत्त्वाची आहे, हे आपण सर्वांनी अनुभवले आहे. हिवाळ्यात सर्दी-खोकला लवकर होते, आणि अशा वेळी आजारी पडणे कोणालाही नकोच असते. हिवाळ्यात अनेक असे खाद्यपदार्थ उपलब्ध असतात जे केवळ चविष्टच नाहीत, तर शरीराला उब देणारे आणि आवश्यक पोषक घटकांनी समृद्ध असतात. बाजारात ताजी फळे आणि भाज्या मोठ्या प्रमाणात उपलब्ध असतात. या हंगामातील निसर्गाची ही देणगी जरूर उपभोगा. या हिवाळ्यात आपल्या आहारात नक्की समाविष्ट करावेत असे काही 'हिवाळी सुपर फूड्स'ची यादी पुढीलप्रमाणे आहे.

**१. बाजरा** – गुजरात, राजस्थान आणि महाराष्ट्रातील मुख्य अन्नपदार्थांपैकी एक असलेला बाजरा हा एक पौष्टिक मिलेट आहे. याचा ग्लायसेमिक इंडेक्स कमी असल्याने ती आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे. यात मॅग्नेशियम भरपूर असून हृदयाच्या आरोग्यासाठी आणि कोलेस्ट्रॉल नियंत्रणासाठी उपयुक्त आहे. बाजरी स्नायूंना ताकद देते आणि त्वचेसाठीही चांगली आहे. ती ग्लूटेन-फ्री असल्यामुळे पचनास हलकी आहे. यात लोह, पोटॅशियम, मॅग्नेशियम, झिंक आणि कॉपर हे खनिजेही मोठ्या प्रमाणात असतात. हिवाळ्यात बाजरीची खिचडी-कढी, बाजरीचे रोटले आणि बाजरी-कांदा रोटी हे आवडते पदार्थ म्हणून खूप लोकप्रिय आहेत.

**२. राताळे** – चविष्ट असण्याबरोबरच राताळ्यात इतर बटाट्यांपेक्षा दुप्पट फायबर असते. त्यात व्हिटॅमिन A, पोटॅशियम, व्हिटॅमिन C आणि व्हिटॅमिन B६ यांसारखे महत्त्वाचे पोषक घटक मोठ्या प्रमाणात असतात. राताळे रोगप्रतिकारक शक्ती वाढवतात, बद्धकोष्ठता कमी करतात आणि शरीरातील सूज कमी करण्यास मदत करतात. हिवाळ्यात उब मिळण्यासाठी आपण राताळे भाजून, वाफवून किंवा आपल्या आवडीनुसार कोणत्याही प्रकारे खाऊ शकता.

**३. खजूर** – खजूर हे आपल्या लहानपणापासून ओळखीचे सुपर फूड आहे. आठवत असेल तर अनेकांच्या आई खजूरचे तुकडे करून त्यात तूप भरून द्यायच्या. हिवाळ्यात नियमित खजूर खाल्ल्याने शरीराला उब मिळते. खजूरमध्ये लोह, प्रथिने, कॅल्शियम आणि अनेक महत्त्वाची जीवनसत्त्वे भरपूर प्रमाणात असतात, जी आरोग्य आणि रोगप्रतिकारक शक्तीसाठी खूप आवश्यक आहेत. रोजच्या आहारात खजूराचा समावेश केल्याने तुमच्या आरोग्याला नक्कीच फायदा होईल.

**४. लिंबूवर्गीय फळे (सिट्रस फ्रूट्स)** – तुम्हाला माहीतच आहे की सिट्रस फळे व्हिटॅमिन C चे मुख्य स्रोत आहेत, जे रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करण्यास मदत करतात. या फळांमध्ये फायबर देखील भरपूर असते. सिट्रस फळे पचन सुधारण्यासाठी आणि वजन कमी करण्यासही उपयोगी आहेत. एक बाउल ताज्या सोललेल्या संत्र्यांमध्ये सुमारे ४ ग्रॅम फायबर मिळते.

**५. सुकामेवा (बदाम, अक्रोड)** – बदाम आणि अक्रोड हे हिवाळ्यातील उत्तम खाद्यपदार्थ आहेत, जे स्नायू आणि मज्जासंस्था (नर्वस सिस्टीम) मजबूत ठेवतात, इन्सुलिनची संवेदनशीलता वाढवतात आणि व्हिटॅमिन E व ओमेगा फॅट्समुळे हे हृदयासाठी फायदेशीर आहेत..

**६. डाळिंब** – हा लाल फळ एंटीऑक्सिडंट्स आणि पोषक घटकांनी समृद्ध आहे, जे शरीरासाठी अत्यंत फायदेशीर आहेत. डाळिंबात व्हिटॅमिन K आणि फायबर भरपूर असते, तसेच तुमच्या दैनंदिन व्हिटॅमिन C ची ४८% गरज पूर्ण होते. या एंटीऑक्सिडंट्समुळे कोलेस्ट्रॉल आणि रक्तदाब कमी होण्यास मदत होते.

**७. ब्रोकोली आणि फुलकोबी** – हिवाळ्यात रोगप्रतिकारक शक्ती मजबूत ठेवण्यासाठी क्रुसिफेरस भाज्या खूप महत्त्वाच्या आहेत. यात व्हिटॅमिन C भरपूर प्रमाणात असते, जे रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यास उपयुक्त आहे. या भाज्या सर्दी-खोकल्यावर मात करतात आणि हिवाळ्यात तुम्हाला सक्रिय ठेवतात. गोभी पराठा, ब्रोकोली सूप हे या भाज्यांचा आहारात समावेश करण्याचे उत्तम पर्याय आहेत. हवामानाशी लढण्यासाठी आपल्या आजीच्या जुन्या घरगुती उपायांना (नुस्ख्यांना) विसरू नका. आले, हळद, मध आणि तुळशीसारख्या सूज कमी करणाऱ्या पदार्थांनी बनवलेला गरम कढा फक्त ऊर्जा वाढवत नाही तर रोगप्रतिकारक शक्तीदेखील मजबूत करतो. तुळशीचा गरम चहा देखील हिवाळ्यात आरामदायक असतो. तुळशीच्या चहातील हर्बल आणि हलक्या लिंबूसारख्या चवीमुळे तो खूप लोकप्रिय आहे. सूप आणि काढा यांसारखी गरम पेये हिवाळ्यात खूप उपयुक्त ठरतात. डिंक, तीळ आणि गूळ हे उष्णता देणारे पदार्थ असून हिवाळ्यात खूप खाल्ले जाते. डिंकाचे लाडू आणि तीळाची चिक्की हिवाळ्यातील लोकप्रिय पदार्थ आहेत.

**हवामान बदलांमध्ये निरोगी कसे राहावे**

सतत बदलणारे हवामान आणि वाढते प्रदूषण यामुळे रोगप्रतिकारक शक्ती कमी होऊ शकते. पण काही छोटे दैनंदिन उपाय शरीराला नैसर्गिकरीत्या जुळवून घेण्यास मदत करतात:

**१. ताजे आणि स्थानिक पदार्थ खा:** स्थानिक बाजारातील हंगामी भाजीपाला आणि फळे खा. ती आपल्या शरीराच्या गरजेनुसार असतात.

**२. आतून उबदार राहा:** थंड सॅलड किंवा स्मूदीऐवजी शिजवलेले, हलक्या मसाल्याचे गरम पदार्थ खा.

**३. हायड्रेटेड राहा :** शरीरात ओलावा टिकवण्यासाठी गरम पाणी, सूप किंवा हर्बल चहा प्या.

**४. प्रोबायोटिक्सचा समावेश करा :** घरचे दही, ताक आणि आंबवलेले पदार्थ पचनासाठी आणि आतड्यांच्या आरोग्यासाठी उत्तम आहेत.

**५. रोगप्रतिकारक शक्ती वाढवा :** रोज आंवळा, हळदीचे दूध आणि हंगामी भाज्या आहारात ठेवा.

**६. आरोग्यदायी फॅट्स वापरा :** जेवणात एक चमचा तूप घ्या. ज्यामुळे पचन सुधारते आणि शरीरातील कोरडेपणा कमी होतो.

**७. सकाळचे ऊन घ्या :** व्हिटॅमिन D मिळते आणि मन प्रसन्न राहते.

**८. व्यायाम करा आणि सक्रिय राहा :** हलके योगासन, चालणे किंवा स्ट्रेचिंग केल्याने रक्ताभिसरण सुधारते.

**९. पुरेशी झोप घ्या :** चांगली झोप शरीराची दुरुस्ती करते आणि प्रतिकारशक्ती मजबूत करते.

भारतामधील हिवाळा म्हणजे शरीराला पोषण देण्याचा काळ आहे, अन्नावर बंधन घालण्याचा नाही. सरसोंचा साग, तीळाचे लाडू आणि पारंपरिक सवयी स्वीकारून आपण हिवाळ्याचा आनंद उब, ताकद आणि चांगल्या आरोग्यासह घेऊ शकतो. हंगामी अन्नपदार्थ खा, मसाले योग्य प्रमाणात वापरा आणि सक्रिय राहा. ही हिवाळ्यासाठी खरी भारतीय आरोग्याची गुरुकिल्ली आहे!

**लेखिका – आहारतज्ज्ञ स्वाती अवस्थी**



## दक्षिण भारतातील ही सुंदर ठिकाणे जिथे अनके चित्रपटांचे चित्रीकरण झाले

केरळ त्याच्या नैसर्गिक सौंदर्य आणि सांस्कृतिक वारशासाठी प्रसिद्ध आहे. या सुंदर राज्यात अनेक प्रमुख बॉलिवूड चित्रपटांचे चित्रीकरण झाले आहे. तसेच केरळ त्याच्या आश्चर्यकारक नैसर्गिक सौंदर्यासाठी, समुद्रकिनारे, पर्वत, धबधबे, बॅकवॉटर आणि वन्यजीव अभयारण्यांसाठी ओळखले जाते. त्याचे आल्हाददायक हवामान आणि त्याचे आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रवास सुलभ करते. त्याच्या विविधतेमुळे आणि सौंदर्यामुळे, अनेक हिट बॉलिवूड चित्रपटांनी केरळला चित्रीकरणासाठी एक ठिकाण म्हणून निवडले आहे. चित्रपट पाहिल्यानंतर ज्यांना केरळला भेट द्यायची आहे त्यांच्यासाठी येथे पाच ठिकाणे आहे जिथे तुम्ही केवळ भेट देऊ शकत नाही तर त्याचे सौंदर्य अनुभवू शकता.

**अथिराप्पिली धबधबा** - अथिराप्पिली धबधबा याला भारताचा नायगारा म्हटले जाते. पावसाळ्यात हा धबधबा त्याच्या पूर्ण वैभवात दिसतो. घनदाट जंगलांनी वेढलेले, हे ठिकाण 'बाहुबली' चित्रपटातील अनेक महत्त्वाच्या दृश्यांचा भाग होते.

**मुन्नार** - चहा आणि मसाल्यांच्या बागांनी वेढलेले, मुन्नार हे केरळमधील सर्वात लोकप्रिय हिल स्टेशनपैकी एक आहे. येथील थंड वारा आणि हिरवळीच्या दऱ्या पर्यटकांसाठी आनंददायी आहे. दर १२ वर्षांनी एकदाच फुलणारी नीलकुरिंजीची फुले पाहण्यासारखी आहे. येथे बॉलिवूड आणि हॉलिवूड दोन्ही चित्रपटांचे चित्रीकरण झाले आहे.

**कुमारकोम आणि बॅकवॉटर्स** - वेब्बनाड तलावाच्या काठावर वसलेले कुमारकोम एक शांत आणि शांत अनुभव देते. हाऊसबोट ट्रिप पर्यटकांसाठी एक लोकप्रिय ठिकाण आहे. या नयनरम्य ठिकाणाच्या नद्या आणि तलाव स्वर्गासारखा अनुभव निर्माण करतात.

**कोवलम बीच** - हा समुद्रकिनारा त्याच्या सुंदर वाळू आणि नारळाच्या झाडांसाठी ओळखला जातो. हा समुद्रकिनारा शांतता आणि नैसर्गिक सौंदर्याचे मिश्रण करतो, ज्यामुळे तो समुद्रकिनारा प्रेमींसाठी एक आदर्श ठिकाण बनतो.

**मीसापुलिमाला हिल स्टेशन** - मीसापुलिमाला हे दक्षिण भारतातील दुसरे सर्वात उंच हिल स्टेशन आहे. ट्रेकिंग प्रेमींसाठी हे एक स्वर्ग आहे. येथील आदिवासी गावांचे सौंदर्य आणि नयनरम्य लँडस्केप प्रवाशांना आकर्षित करतात. केरळमधील ही पाच ठिकाणे बॉलिवूड चित्रपटांची छाप धारण करतात आणि निसर्ग प्रेमी आणि प्रवास प्रेमींसाठी उत्कृष्ट ठिकाणे असल्याचे सिद्ध होते.

## नाचणीची खिचडी

खाना-खजाना



**साहित्य :** तांदूळ- १ कप, मूग डाळ- १/२ कप, नाचणी- १/२ कप मटार, गाजराच्या फोडी, हिरव्या मिरचीचे तुकडे- ३ ते ४, हिंग- १/२ टीस्पून, हळद- १ टीस्पून, गरम मसाला- १ टीस्पून, मोहरी- १ टीस्पून, जिरे- १ टीस्पून, पाणी, मीठ, तूप.

**कृती :** नाचणीची खिचडी बनवण्यासाठी तांदूळ, नाचणी आणि मुगडाळ स्वच्छ धुवून घ्या. आता कुकरमध्ये तूप गरम करून त्यात मोहरी, जिरे, हिंग, हळद, हिरव्या मिरच्या, मटार आणि गाजर घालून परतून घ्या. भाज्या परतल्या की त्यात धुतलेले तांदूळ, नाचणी आणि मुगडाळ घाला. त्यात मीठ, गरम मसाला घालून परतून घ्या आणि २ कप पाणी घालून कुकरचं झाकण लावा. २ शिट्ट्या झाल्यावर तयार आहे तुमची पौष्टिक नाचणीची खिचडी. खिचडीवर तूप घालून पापड आणि लोणच्यासह सर्व्ह करा.

दैनिक लोकरक्षणाय
सर्व सर्जनशील वाचकांसाठी संधी



माहितीयुक्त, जागरूकता पसरवणारे, कायद्याचे ज्ञान देणारे स्वलिखित लेख



भावनात्मक, जागरूकता पसरवणारे, ज्ञान-बोध देणारी स्वलिखित कविता



पौष्टिक आणि सत्त्वयुक्त, स्वादिष्ट, आगळ्या-वेगळ्या पाककला रेसिपी



सामन्यातून असामान्य, वीरता, यश, प्रेरणात्मक, बोध कथा



महाराष्ट्रातील विविध पर्यटन स्थळांची, समृद्ध सांस्कृतिक वारशाची माहिती

ध्यास+
समुदायातील सकारात्मक आवाजांना बळकटी देण्यासाठी एक व्यासपीठ
ध्यास सकारात्मकतेचा

# देवाची नक्कल, जीवघेणा हल्ला ते मोडलेलं लग्न; कॉन्ट्रोवर्सीने हादरलं २०२५ वर्ष

२०२५ हे वर्ष बॉलिवूड आणि मराठी चित्रपटसृष्टीसाठी संमिश्र ठरलं. या वर्षी अनेक चित्रपटांनी बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घातला. तर काही चित्रपट फ्लॉप ठरले. अनेक प्रसंगी वाद निर्माण झाल्याने त्याचा परिणाम चित्रपटाच्या कलेक्शनवर झाला. तसेच अनेक बॉलिवूड स्टार्स आपल्या वर्तनामुळं वादात अडकले. चला तर मग सरत्या वर्षानिमित्त बॉलिवूड आणि मराठी सिनेसृष्टीतील सर्वात गाजलेल्या कॉन्ट्रोवर्सी जाणून घेऊया...

**दीपिका पदुकोण**

बॉलिवूडबद्दल बोलायचं झाल्यास अभिनेत्री दीपिका पदुकोण ही तिच्या ८ तासांच्या शिफ्टच्या मागणीमुळं प्रचंड ट्रोल झाली होती. काहींनी तिच्या या मागणीचं समर्थन केलं तर काहींनी त्याला विरोध दर्शवला. खरं तर, अभिनेत्री दीपिका पादुकोणने फिल्म इंडस्ट्रीत सगळ्यांनाच ८ तासांची शिफ्ट असावी अशी मागणी केली होती. तिच्या या मागणीवर मेकर्स, कलाकार यांनी सकारात्मक आणि नकारात्मक प्रतिक्रिया दिल्या होत्या.

**रणवीर सिंह**

अलीकडेच धुरंधर या चित्रपटामुळं चर्चेत असलेला अभिनेता रणवीर सिंह हा त्याच्या आणखी एका कृत्यामुळं चर्चेत राहिला. त्यानं गोव्यात झालेल्या IFFI २०२५ च्या समारंभात 'कांतारा: चॅप्टर १' चित्रपटाचं कौतुक करत असताना चित्रपटातील 'दैव' भूमिकेची नक्कल केली. त्याचा हा व्हिडिओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाला. त्याला अनेक स्तरातून ट्रोलिंगचा सामना करावा लागला. यानंतर त्यानं याप्रकरणी जाहीर माफी मागितली होती.

**सैफ अली खान**

वर्षाची सुरूवातच बॉलिवूडच्या प्रसिद्ध अभिनेत्यावर धक्कादायक हल्ल्याने झाली. १६ जानेवारी २०२५ रोजी सैफ अली खानवर अज्ञाताने हल्ला केला. मुंबईतील वांद्रे येथील सैफच्या निवासस्थानी ही घटना घडली. हा हल्लेखोर चोरीच्या उद्देशाने शिरला होता. मात्र, सैफने त्याला रोखण्याचा प्रयत्न केला असता, दोघांमध्ये झटापट झाली. यात हल्लेखोराने सैफवर चाकूने वार केले. तेव्हा त्याला तातडीने लीलावती रुग्णालयात दाखल करण्यात आले होते, जिथे त्याच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली. मात्र या घटनेमुळं बॉलिवूडसह संपूर्ण देश हादरला होता. सेलिब्रिटींच्या सुरक्षेचा प्रश्न उपस्थित झाला. तसेच मुंबई पोलिसांवरही अनेकांनी नाराजी व्यक्त केली होती.

**परेश रावल**




बॉलिवूडचे ज्येष्ठ अभिनेते परेश रावल हे काही कारणास्तव बहुप्रतिक्षित 'हेरा फेरी ३' मधून अचानक बाहेर पडल्याची बातमी समोर आली. यामुळं चाहत्यांनी मोठ्या प्रमाणात नाराजी व्यक्त केली. कायदेशीर कारवाईच्या अफवाही पसरल्या, पण नंतर पुन्हा परेश रावल चित्रपटात परतले.

**काजोल**

बॉलिवूडची प्रसिद्ध अभिनेत्री काजोल माध्यम प्रतिनिधींशी केलेल्या एका वर्तनामुळे चर्चेत आली होती. एका पुरस्कार सोहळ्यात काजोलने हिंदीत बोलण्यास नकार दिल्यामुळे सोशल मीडियावर वादाला तोंड फुटलं होतं.

**संतोष जुवेकर**

लक्ष्मण उतेकर दिग्दर्शित 'छावा' या चित्रपटात मराठमोळा अभिनेता संतोष जुवेकरने रायाजींची भूमिका साकारली होती. या चित्रपटानिमित्त दिलेल्या एका मुलाखतीत संतोषने सेटवर औरंगजेबाच्या भूमिकेत असलेल्या अभिनेता अक्षय खन्नाशी बोललोच नाही, असं वक्तव्य केलं होतं. यावरून त्याला प्रचंड ट्रोल करण्यात आलं होतं.

**प्राजक्ता माळी**

मराठमोळी अभिनेत्री प्राजक्ता माळी ही मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणी चर्चेत आली होती. कारण भाजप आमदार सुरेश धस यांनी याप्रकरणी उल्लेख करताना प्राजक्ता माळीचे नाव घेतलं आणि वाद निर्माण झाला. नंतर प्राजक्ताने धस यांनी माफी मागावी अशी मागणी केली होती. तसेच पत्रकार परिषद घेऊन आपली बाजू मांडली होती.

**बॉलिवूड चित्रपटाचे वाद**

छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनावर आधारित 'छावा' या चित्रपटाला सुरुवातीला वादाचा सामना करावा लागला. ट्रेलरमध्ये छत्रपती संभाजी महाराजांची भूमिका साकारणाऱ्या अभिनेता विक्की कौशलला लेजीम खेळताना दाखवण्यात आलं होतं. याला अनेकांनी विरोध दर्शवल्यानंतर चित्रपटातून ते दृश्य हटवण्यात आलं.

**मराठी चित्रपट वादात**

तसेच 'मनाचे श्लोक' या मराठी चित्रपटाला विरोध आणि कायदेशीर आव्हानांना सामोरे जावे लागले, कारण लिव्ह-इन रिलेशनशिपची कथा असलेल्या या चित्रपटाला संत समर्थ रामदास स्वामी यांच्या पवित्र ग्रंथाचं नाव दिल्यानं वाद निर्माण झाला होता. यामुळं चित्रपट प्रदर्शित होऊनही अनेक ठिकाणी शो बंद पाडण्यात आले. नंतर निर्मात्यांनी चित्रपटाचं नाव बदलून तो पुन्हा रिलीज केला होता. त्याचप्रमाणे 'खालिद का शिवाजी' या चित्रपटाला हिंदुत्ववादी संघटनांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहासाला चुकीच्या पद्धतीने सादर केल्याचा आरोप करत प्रदर्शनावर बंदी घालण्याची मागणी केली होती.

**पाकिस्तानी कलाकारांवर बंदी**

एप्रिल २०२५ मध्ये झालेल्या प्राणघातक पहलगाम हल्ल्यानंतर संपूर्ण देश हादरला होता. त्यावेळी पाकिस्तानी कलाकारांवर बंदी घालण्यात आली. तसेच पाकिस्तानी कलाकारांचे इंस्टाग्राम अकाउंट्स भारतीय युजर्ससाठी ब्लॉक करण्यात आले होते.

**स्मृती मानधना आणि पलाश मुच्छल**

भारतीय महिला क्रिकेट संघाची स्टार फलंदाज स्मृती मानधना आणि प्रसिद्ध संगीतकार पलाश मुच्छल गेल्या काही दिवसांपासून त्यांच्या विवाहाच्या बातम्यांमुळे चर्चेत होते. गेल्या पाच वर्षांपासून एकमेकांना डेट केल्यानंतर, त्यांनी २३ नोव्हेंबर २०२५ रोजी सांगली येथे विवाहबंधनात अडकण्याचा निर्णय घेतला होता. मात्र हा सोहळा अनपेक्षित वळणांमुळे चर्चेचा विषय ठरला. विवाहाच्या अगदी एक दिवस आधी, स्मृतीचे वडील श्रीनिवास मानधना यांची प्रकृती अचानक बिघडल्याने त्यांना रुग्णालयात दाखल करावं लागलं.

यामुळं लग्न तात्पुरतं पुढे ढकलण्यात आलं होतं. मात्र त्यानंतर सोशल मीडियावर पलाशच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल काही अफवा पसरल्या. त्याने स्मृतीला धोका दिल्याचं म्हटलं गेलं.

अखेर ७ डिसेंबर २०२५ रोजी स्मृतीने अधिकृतपणे लग्न रद्द झाल्याचं जाहीर केलं. मात्र स्मृती- पलाशचं मोडलेलं लग्न हा कॉन्ट्रोवर्सीचा विषय ठरला.

## लग्न आणि तारिणीमुळं २०२५ ठरलं अविस्मरणीय; शिवानी सोनारनं केला नव्या वर्षाचा संकल्प

झी मराठीवरील 'तारिणी' मालिकेत झळकणारी अभिनेत्री शिवानी सोनार हिने २०२५ या सरत्या वर्षातल्या तिच्या खास आठवणी आणि अनुभव शेअर केले. शिवानीसाठी हे वर्ष अत्यंत महत्त्वाचे ठरले. शिवानी म्हणाली, '२०२५ माझ्यासाठी खूप खास आहे. जानेवारी २०२५ मध्ये माझे लग्न झालं आणि माझ्या आवडत्या व्यक्तीसोबत माझ्या आयुष्याची नवी इनिंग सुरू झाली. लग्नानंतर जीवनात बरेच बदल होतात आणि माझ्या बाबतीत हे सर्व बदल सकारात्मक होते. कुटुंबापासून दूर राहण्याची सवय नव्हती. मी नक्कीच माझ्या कुटुंबाला खूप मिस करते. माझा धाकटा भाऊही यावर्षी कामासाठी बंगलोरला गेला. पहिल्यांदाच तो माझ्यापासून दूर आहे, पण तो त्याच करिअर बनवतोय, आयुष्यात पुढे जात आहे हे बघून मला आनंदही आहे', अशा भावना शिवानीने आपल्या कुटुंबाबद्दल व्यक्त केल्या आहेत.

व्यावसायिक आयुष्याबद्दल बोलताना शिवानी म्हणाली, 'या वर्षी मला 'तारिणी' ही नवीन मालिका मिळाली. मी साकारत असलेल पात्र माझ्यासाठी खूप खास आहे. झी मराठी आणि निर्मितीसंस्थेसोबत हे माझं पहिलच असोसिएशन आहे. संपूर्ण टीमसोबत काम करण्याचा मला खूप आनंद मिळतोय. २०२५ मधील अविस्मरणीय क्षणांपैकी एक सांगायचं तर माझं लग्न आणि माझी तारिणी मालिकेसाठी संपूर्ण महाराष्ट्रात भलीमोठी लागलेली होर्डिंग्स. मला ते पाहून अतिशय आनंद होत होता'. असं शिवानी म्हणाली.आपले अनुभव आणि भावना सांगत असताना शिवानीने तिच्या नव्या वर्षाच्या संकल्पाबद्दलही सांगितलं. ती म्हणाली, 'या वर्षी आरोग्याकडे पुरेसे लक्ष देता न आल्याची खंत मला आहे. त्यामुळे पुढील वर्षात व्यायाम, झोप आणि एकूणच दिनचर्या सुधारण्याचे ठरवले आहे. हे सध्या 'वर्क इन प्रोग्रेस' आहे. २०२५ तू माझं आयुष्य सकारात्मक केलस'. नववर्ष साजरे करण्याबाबत शिवानी म्हणाली, 'दरवर्षी मी कुटुंब-मित्रपरीवार सोबत नववर्ष साजरे करते. पण यंदा कदाचित मी 'तारिणी'च्या शूटवर असेन. तरीही शूट सांभाळून माझ्या प्रियजनांसोबतच मी नवीन वर्षाचे स्वागत करेन'.



## 'होमबाऊंड' चित्रपट ऑस्कर पुरस्कारांच्या शर्यतीत

**नवी दिल्ली :** दिग्दर्शक नीरज घेवान यांच्या 'होमबाऊंड' चित्रपटाला ९८व्या अकादमी पुरस्कारांमध्ये म्हणजेच ऑस्कर पुरस्कारांमध्ये 'सर्वोत्कृष्ट आंतरराष्ट्रीय फीचर फिल्म' श्रेणीतील टॉप १५ शॉर्टलिस्टेड चित्रपटांमध्ये स्थान मिळाले आहे. या चित्रपटात ईशान खट्टर, विशाल जेठवा आणि जान्हवी कपूर मुख्य भूमिकेत आहेत.

'अकादमी ऑफ मोशन पिक्चर आर्ट्स अँड सायन्सेस'ने मंगळवारी १२ श्रेणींची शॉर्टलिस्ट जाहीर केली. तर, आंतरराष्ट्रीय फीचर फिल्म श्रेणीमध्ये एकूण १५ चित्रपटांची निवड करण्यात आली आहे. यापैकी पुढे केवळ ५ चित्रपटांना अंतिम नामांकन मिळेल. या नामांकनांची घोषणा २२ जानेवारी २०२६ रोजी केली जाईल. त्यानंतर ऑस्कर पुरस्कार सोहळा १५ मार्च २०२६ रोजी पार पडेल.




'होमबाऊंड'सोबत ज्या चित्रपटांची निवड करण्यात आली आहे, त्यात अर्जेंटिनाच्या 'बेलेन', ब्राझीलच्या 'द सिक्रेट एजंट', फ्रान्सच्या 'इट वॉज जस्ट एन ॲक्सिडेंट', जर्मनीच्या 'साउंड ऑफ फॉलिंग', इराकच्या 'द प्रेसिडेंट्स केक', जपानच्या 'कोकुहो', जॉर्डनच्या 'ऑल दॅट्स लेफ्ट ऑफ यू', नॉर्वेच्या 'सेंटिमेंटल व्हॅल्यूज', पॅलेस्टाईनच्या 'पॅलेस्टाईन ३६', दक्षिण कोरियाच्या 'नो अदर चॉईस', स्पेनच्या 'सिरात', स्वित्झर्लंडच्या 'लेट शिफ्ट', तैवानच्या 'लेफ्ट हॅंडेड गर्ल' आणि ट्युनिशियाच्या 'द व्हॉईस ऑफ हिंद रजब' या चित्रपटांचा समावेश आहे.

## काय आहे जपानी वॉटर थेरपी?; जाणून घ्या त्याचे फायदे

शरीरासाठी पाणी आवश्यक आहे. पाण्याच्या कमतरतेमुळे डिहायड्रेशन होऊन अनेक रोगांचा धोका निर्माण होतो. पाण्याचा आपल्या त्वचेवर आणि केसांवरही चांगला परिणाम होतो. त्यामुळे तज्ज्ञ एका व्यक्तीने सुदृढ राहण्यासाठी सुमारे ८ ग्लास पाणी प्यावे असे सांगतात. जपानी लोक फिटनेस आणि सौंदर्याचे रहस्य म्हणून पाण्याकडे पाहतात आणि विशिष्ट प्रकारच्या वॉटर थेरपीचा सराव करतात. ही थेरपी विशेषत: वजन कमी करण्यासाठी आणि शरीर फिट ठेवण्यासाठी ओळखली जाते. ही थेरपी नक्की कशी केली जाते? जपानी वॉटर थेरपीचे शरीरावर काय परिणाम होतात? जाणून घेऊयात सविस्तरपणे



जपानी वॉटर थेरपी म्हणजे सकाळी उठल्याबरोबर काहीही न खाता पाणी पिणे. शक्यतो कोमट पाणी पिण्यावर भर देणे. रिकाम्या पोटी पाणी प्यायल्याने शरीरातील सर्व विषारी पदार्थ सहज निघून जातात. या थेरपीच्या नियमानुसार ब्रश केल्यानंतर ४५ मिनिटांनीच पाणी प्यावे. ब्रश तुम्ही करू शकता. सर्वात महत्त्वाचे म्हणजे उभे राहून पाणी पिऊ नये. एका जागी बसून पाणी प्यावे.

**फायदे** –

■ जपानी वॉटर थेरपीमुळे ताणतणाव दूर होतो.

■ वजन नियंत्रणात ठेवण्यासाठी ही जपानी थेरपी खूप उपयुक्त असते.

■ पचनसंस्था सुधारल्याने दिवसभर तुम्हाला ताजेतवाने वाटते.

■ केसांच्या समस्या कमी होऊन केसवाढीस प्रोत्साहन मिळते.

■ त्वचेच्या समस्या असतील तर जपानी वॉटर थेरपी फॉलो करावी.




**मेष** – व्यवसायात नवे डावपेच योग्य पद्धतीने हाताळाल. नकारात्मक विचार करू नका. थकवा आणवेल. मान-सन्मान प्राप्त होईल.

**वृषभ** – कौटुंबिक जीवनाचा आनंद घ्याल. लहान प्रवास करू शकाल. अध्यात्मात रमाल. जिभेवर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.

**मिथुन** – मनाची खंबीरता सिद्ध करावी लागेल. आर्थिक प्रश्न सोडवण्यात यश मिळेल. आपल्या कल्पक योजनांचे कौतुक होईल. कार्यक्षेत्रात सुयश मिळेल.

**कर्क** – आकस्मिक खर्च होईल. नोकरीधंद्यात वरिष्ठांचे मार्गदर्शन आपल्यासाठी हितकारक ठरेल. आर्थिक व्यवहारात लाभ होईल.

**सिंह** – आपले निर्णय अचूक ठरतील. आपल्या कार्याचे कौतुक मनास समाधान प्रदान करेल. पैशांच्या व्यवहारात पारदर्शकता ठेवा.

**कन्या** – काम करताना विचारपूर्वक निर्णय घ्या. मित्रांच्या भेटीगाठी होतील. आपल्या व्यावहारिक अडचणी सोडवण्यास प्राधान्य द्या.

**तूळ** – आपणास प्रगतीच्या दिशेने पाऊल टाकणे शक्य होईल. भागीदाराची साथ मनास प्रेरणा देणारी ठरेल. विरोधक निष्प्रभ ठरतील.

**वृश्चिक** – आपल्या कामातील गुणवत्ता वाढवणे अगत्याचे आहे. वैवाहिक जीवनात समाधानाचे संकेत मिळतील. आनंदवार्ता समजतील.

**धनु** – आपल्या नोकरीधंद्यातील प्रयत्नामध्ये कमी पडू नका. कुटुंबातील सदस्यांशी क्षुल्लक वाद संभवतात. आपली तब्येत सांभाळा.

**मकर** – मित्रपरिवाराकडून भेट मिळाल्याने दिवस आनंदात जाईल. आपल्या कौटुंबिक जबाबदारीस तत्परतेने न्याय द्या. कार्यक्षेत्रात सुयश मिळेल.

**कुंभ** – कलागुणांना प्रोत्साहन मिळेल. विरोधकांचा विरोध मावळेल. आर्थिक बाजू सुधारेल. वरिष्ठांशी मिळते-जुळते धोरण स्वीकारावे.

**मीन** – सामाजिक क्षेत्रात गैरसमज होणार नाही याची दक्षता घ्या. नवीन वस्तूंचे खरेदीचे बेत साध्य होतील. काळजीपूर्वक गुंतवणूक करा.

# पाच वर्षात दोन लाखांहून अधिक एचआयव्हीग्रस्त रुग्णांनी सरकारचा मोफत औषधोपचार घेणं थांबवलं

**मुंबई (विशाल कारंडे) :** देशातील एचआयव्हीग्रस्त रुग्णांसाठी सुरू असलेल्या मोफत औषधोपचार व्यवस्थेबाबत गंभीर आणि चिंताजनक चित्र समोर आलं आहे. हा संपूर्ण प्रकार माहिती अधिकार कायद्यांतर्गत समोर आला आहे. माहिती अधिकार कार्यकर्ते चेतन कोठारी यांनी दाखल केलेल्या अर्जाला उत्तर देताना 'राष्ट्रीय एड्स नियंत्रण संस्थे'नं दिलेल्या आकडेवारीनुसार, वर्ष २०२०-२१ पासून सप्टेंबर २०२५ पर्यंत देशभरात तब्बल २ लाख १२ हजार ९९० एचआयव्हीग्रस्त रुग्ण नियमित औषधोपचारातून बाहेर पडले आहेत.

ही माहिती राष्ट्रीय एड्स आणि लैंगिक रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत नोंदणीकृत उपचार केंद्रांमधील असून औषधोपचार सुरू करूनही मोठ्या प्रमाणावर रुग्ण उपचारावर टिकून राहत नसल्याचं स्पष्ट झालं आहे. यामुळे, एचआयव्हीवर नियंत्रण ठेवण्यासाठी करण्यात येणाऱ्या प्रयत्नांमध्ये एक गंभीर अडचण निर्माण झाली आहे.




**उपचारांमधून बाहेर पडलेल्या रुग्णांमध्ये मोठी वाढ :** विशेष म्हणजे, २०२४-२५ आणि २०२५-२६ या दोन वर्षांमध्ये उपचारातून बाहेर पडणाऱ्या रुग्णांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढलेली दिसून येत आहे. ही स्थिती आरोग्य यंत्रणेसाठी अत्यंत गंभीर आहे. महाराष्ट्र आणि मुंबईतील परिस्थिती अधिक चिंताजनक आहे. राज्यनिहाय आकडेवारीनुसार, तेलंगाणा, कर्नाटक, पंजाब, आंध्र प्रदेश, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल आणि महाराष्ट्र या राज्यांमध्ये औषधोपचारातून बाहेर पडलेल्या रुग्णांची संख्या खूप मोठी आहे.

**मुंबई आणि महाराष्ट्रात काय स्थिती? :** महाराष्ट्रात, २०२०-२१ ते सप्टेंबर २०२५ या कालावधीत १५,४३० रुग्ण औषधोपचाराच्या नियमित संपर्कातून बाहेर पडले. याच कालावधीत, मुंबई शहरात ३,८७१ एचआयव्हीग्रस्त रुग्ण उपचारातून बाहेर पडले.

**उपचार खंडित होण्याचे गंभीर परिणाम :** औषधोपचार खंडित झाल्यास रुग्णांच्या प्रकृतीवर गंभीर परिणाम होऊ शकतात. यामुळे रुग्णांची रोगप्रतिकारशक्ती झपाट्यानं कमी होऊ शकते, तसंच औषधांचा प्रभावही कमी होण्याचा धोका वाढतो. यामुळे एचआयव्ही संसर्ग इतरांमध्ये पसरण्याची शक्यता देखील अधिक होऊ शकते, असं महापालिकेच्या कार्यकारी आरोग्य अधिकारी डॉ. दक्षा शाह यांनी म्हटलं आहे.

त्यांनी पुढे सांगितलं की, तातडीच्या उपाययोजनांची आवश्यकता आहे आणि या संदर्भातील आकडेवारी माहिती अधिकारातून समोर आली आहे. रुग्णांचा सातत्यानं पाठपुरावा आणि समुपदेशन व्यवस्था बळकट करण्याची आवश्यकता आहे. त्याचप्रमाणे, सामाजिक, आर्थिक अडचणी, स्थलांतर, सामाजिक भीती यांसारख्या कारणांचा अभ्यास करणंदेखील अत्यावश्यक आहे. सोबतच, डॉ. शाह यांनी स्पष्ट केलं की, मुंबईमधील एचआयव्ही रुग्णांची संपूर्ण माहिती मिळवूनच त्याबद्दल योग्य विधान करणं आवश्यक आहे.

SPORTS

# From Bharatpur To Chennai Super Kings - The Inspiring Journey Of Kartik Sharma

**Bharatpur** : A father's unfulfilled dream of becoming a cricketer has translated into his son's remarkable success as 19-year-old Kartik Sharma has been bought by the Chennai Super Kings (CSK) for a record Rs 14.20 crore in the Indian Premier League 2026 mini-auction. Besides representing the price of Kartik's talent, the sum also signals the triumph of his father, Manoj Sharma's years of sacrifice, struggle and perseverance.

Kartik comes from Darapur village of Bharatpur in Rajasthan. His father was once a medium-pace bowler on his way to making a name for himself. But a serious shoulder injury prematurely ended his career leaving him shattered. But resolved that his children, whether son or daughter, would accomplish what he had set out to do.

Both Manoj and Kartik shared their journey with ETV Bharat in an exclusive interaction. Manoj related, "I never gave up. I believed my child would fulfill my unfulfilled dream." Thereafter he put this resolve into action.

He revealed that Kartik was handed a bat at the tender age of two and the courtyard of their home became his first cricket ground. For nearly five years, Kartik received basic training from his father at home. Manoj said that even at a very young age, Kartik's understanding and technique were such that everyone was amazed. Manoj himself would bowl for hours and teach his son the nuances of the game.

After initial training, Kartik was sent to Shatrughan Tiwari, Secretary of Bharatpur District Cricket Association. After several years of training, Tiwari was clear that the child's level was far above what was prevalent in Bharatpur.

The family made the bold decision to shift Kartik to Agra in Uttar Pradesh for better coaching. There, he received a better environment and coaching at the academy run by cricketer Deepak Chahar's father, Lokendra Singh Chahar. Manoj explained that Kartik's power hitting and long sixes were honed at the academy. He became famous for his Kevin Pietersen-like shots.





Kartik is a wicketkeeper-batter and is known for his explosive batting in domestic cricket. His strike rate in Syed Mushtaq Ali Trophy was above 160. After playing for Rajasthan's Under-14, Under-16 and Under-19 teams, Kartik will now share the dressing room with former Indian skipper Mahendra Singh Dhoni at the CSK.

But Kartik's journey has not been an easy one. His father used to run the house by giving private tuitions that he left when his son's practice started getting affected. He sold his land and shop to pay for Kartik's cricket kit, training and travel expenses. He even had to take a loan of around Rs 28 lakh. Kartik's mother also pitched in by selling her jewellery. Manoj disclosed that the household expenses were managed by the pension of Kartik's grandfather. Manoj has three sons, two of whom play cricket.

He said, "My dream is that my sons play for the country and bring glory to India." Karthik's base price at the IPL 2026 mini-auction held in Abu Dhabi on December 16, 2025 was just Rs 30 lakh. Following an intense bidding among IPL teams, CSK finally bought him for Rs 14.20 crore, a record amount for an uncapped player.

This was not the price of a player but the victory of years of hard work, sacrifice and faith. Coming from a small town, Kartik has proved that lack of resources are no deterrence to achieving goals. Kartik humbly gave credit to his parents for his achievement. He said that it is their faith and sacrifice that have brought him to this level and his dream now is to get a foothold in the Indian team.

He has a message for the youth of the country. "With hard work and discipline, no dream is impossible," he said.

The news of his becoming a part of the CSK has been greeted with joy across Bharatpur with the District Cricket Association and various organisations according Kartik and his family a grand welcome. The joy was expressed by bursting firecrackers and distributing sweets.

## Sourav Ganguly Slaps Rs 50 Cr Defamation Suit On Football Fan Club Official

**Kolkata** : Sourav Ganguly has slapped a Rs 50 crore defamation suit notice on an official of a Kolkata-based football fan club for "falsely" dragging his name into the Lionel Messi fiasco and making derogatory and defamatory public statements about the former India cricket captain.

Cricketer turned sports administrator Ganguly had also lodged a police complaint against Uttam Saha of 'Argentina Football Fan Club' on Thursday. "Besides the police complaint, I have sent this official of the football fan club a Rs 50 crore legal notice. They keep saying anything that comes to their mind," Ganguly told PTI.

Saha, while speaking to a journalist, had accused Ganguly of being the actual man behind organising Messi's G.O.A.T India tour and alleged that it's now-arrested prime organiser Satadru Dutta was only a front.

In his complaint emailed to the Cyber Cell of the Kolkata Police, Ganguly said the person's statements have adversely affected his reputation and mental peace. "The complaint states that he deliberately levelled serious allegations against Ganguly without any factual basis," a police officer said, adding that an investigation in currently underway based on the complaint.



Ganguly added in the complaint that such "baseless allegations appear to be an attempt to tarnish his hard-earned reputation". In his e-mail, Ganguly stated that in his professional career, spanning over several decades, he earned a reputation in the country and worldwide as a sportsperson and sports administrator and that "baseless" statements aim to tarnish that image.Ganguly was scheduled to remain on the platform to felicitate the Argentine football legend and his entourage alongside Chief Minister Mamata Banerjee and other dignitaries on December 13, but the programme was cancelled in the wake of widespread spectator rampage inside the Salt Lake stadium following Messi's premature exit from the venue.

## Colombia Cup Final Ends In Chaos As Pitch Battle Results In 59 Getting Injured

**Hyderabad** : The final of the Colombia Cup between Atletico Nacional and Deportivo Independiente Medellin in Medellin turned violent as 59 people, including seven police officers, got injured during the chaotic scenes which unfurled after the match. The violence overshadowed Nacional's hard-earned title triumph.

The chaos erupted moments after the final whistle at the Atanasio Girardot Stadium, where Atletico Nacional emerged triumphant by 1-0 to lift the silverware. It was supposed to be a night of celebration for Nacional fans, but the night was marked by violence as fans from both sides stormed the pitch, hurled projectiles in the field and were engaged in a clash with the security forces.

The videos of the fans hitting each other are going around on social media. The videos show fans breaching the different sections of the ground and confrontations breaking out between them.



Riot Police were compelled to intervene in the situation as the scenes were getting out of hand in a stadium packed with 43,000 spectators.

Medellin's security secretary, Manuel Villa, confirmed that 52 fans sustained injuries during the violent breakout, as quoted by news agency AFP. The police officers said that seven of them were also hurt during the brutal fight that took place. No arrests were made in the matter, but authorities were reviewing the CCTV footage to identify the perpetrators.

The unrest resulted in the cancellation of the post-match trophy celebration and medal ceremony.

Usually, visiting fans are prohibited from attending matches between major teams to manage crowd trouble. However, Medellin city hall had decided to allow fans of Atlético Nacional as the home side to promote peaceful co-existence in football.

Mayor Federico Gutierrez condemned the violence, saying those who caused the disturbance are "criminals" and "misfits."

## आदर्श आचारसंहितेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी

# कडक उपाययोजना करा, बीएमसी आयुक्त गगराणी यांचे निर्देश

● मुंबई, विशाल कारंडे :



बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी निर्भय, मुक्त आणि पारदर्शक वातावरण निर्माण करण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी आवश्यक दक्षता घ्यावी, अशी सुचना बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त आणि जिल्हा निवडणूक अधिकारी भूषण गगराणी यांनी केली आहे.

खरं तर, मतदान केंद्रांची अंतिम यादी तयार करण्यापूर्वी मतदान केंद्रांची प्रत्यक्ष पाहणी करणं आवश्यक आहे. निवडणूक प्रक्रियेतील संबंधित अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची नियोजित कालमर्यादेत नियुक्ती करून त्यांना प्रशिक्षण देणंदेखील महत्त्वाचे आहे. तसेच, निवडणुकीच्या अनुषंगानं विविध पथकं कार्यरत ठेवावीत, असे निर्देश महानगरपालिका आयुक्त गगराणी यांनी दिले आहेत. आदर्श आचारसंहितेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पोलीस, उत्पादन शुल्क व इतर संबंधित विभागांसोबत प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याच्या सूचनाही गगराणी यांनी दिल्या आहेत.

**मतदान केंद्रांजवळ 'मतदार सहाय्य केंद्र' :** गुरुवारी (१८ डिसेंबर) बोलताना आयुक्त भूषण गगराणी यांनी सांगितलं की, राज्य निवडणूक आयोगानं मतदान केंद्र निश्चितीबाबत निकष ठरवले आहेत. त्यानुसार, बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रात सुमारे १०,१११ मतदान केंद्रे आहेत. या मतदान केंद्रांवर वीज पुरवठा, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, प्रसाधनगृहे, रॅम्प आदी सुविधांची तयारी केली आहे. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी या सुविधांची पाहणी व पडताळणी केली पाहिजे.

त्यानंतर अंतिम मतदान केंद्रांची यादी तयार केली जाईल. मतदारांना त्यांच्या नावं शोधणं सोयीचं व्हावं, यासाठी मतदान केंद्रांच्या जवळ 'मतदार सहाय्य केंद्र' स्थापित करणं आवश्यक आहे. तसेच, मतदान केंद्रांवर मतदारांना माहिती देणारे फलक लावले जावे, असे निर्देशदेखील त्यांनी दिले.

**'समन्वय साधून काम करावं' :** निवडणूक प्रक्रियेसाठी आवश्यक अधिकारी आणि कर्मचारी नेमण्याची प्रक्रिया सुरू आहे. निवडणूक कामकाजात नियुक्त अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिलं जाणार आहे. मतदान प्रक्रिया, निवडणूक कायदे, आदर्श आचारसंहिता, ईव्हीएम हाताळणी तसेच, मतदान केंद्रावरील जबाबदाऱ्या याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात येईल. निवडणूक प्रक्रिया यशस्वी होण्यासाठी सर्व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण घेणं बंधनकारक असून दिलेल्या सूचनांचे काटेकोर पालन करणं आवश्यक आहे. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी महानगरपालिका परिमंडळ उपआयुक्त, प्रशासकीय विभागांचे सहायक आयुक्त यांच्याशी संवाद साधावा आणि समन्वय साधून कार्यवाही करावी, अशी सूचनाही गगराणी यांनी केली.

**संशयास्पद हालचालींवर तत्काळ कारवाई :** आदर्श आचारसंहितेची प्रभावी आणि काटेकोर अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी पोलीस विभाग, उत्पादन शुल्क विभाग तसेच, इतर संबंधित विभागांच्या समन्वयातून सर्व आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवाव्यात. निवडणूक काळात मतदारांवर प्रभाव टाकण्यासाठी होणाऱ्या गैरप्रकारांवर कडक लक्ष ठेवलं पाहिजे. कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी संवेदनशील आणि अतिसंवेदनशील भागांमध्ये विशेष दक्षता घेतली पाहिजे.

नियमित गस्त, तपासणी नाके, वाहन तपासणी तसेच, संशयास्पद हालचालींवर तत्काळ कारवाई केली जावी. आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन आढळल्यास संबंधितांवर नियमानुसार त्वरित आणि कठोर कारवाई केली जावी, असे निर्देशही महानगरपालिका आयुक्त गगराणी यांनी दिले आहेत.

## भारत-ओमानची मुक्त व्यापार करारावर स्वाक्षरी



● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुलतान हैथम बिन तारिक यांच्याशी चर्चा केल्यानंतर भारत आणि ओमानने गुरुवारी मुक्त व्यापार करारावर स्वाक्षरी केली. त्यामुळे द्विपक्षीय धोरणात्मक भागीदारी अधिक बळकट झाली. आपल्या तीन देशांच्या दौऱ्याच्या शेवटच्या टप्प्यात बुधवारी ओमानमध्ये दाखल झालेल्या मोदींचे द्विपक्षीय बैठकीपूर्वी मस्कतमधील अल बराका पॅलेसमध्ये सुलतान हैथम यांनी स्वागत केले.परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी सांगितले की, दोन्ही नेत्यांनी संरक्षण, सुरक्षा, व्यापार आणि गुंतवणूक, ऊर्जा, कृषी, तंत्रज्ञान, नवीन आणि उदयोन्मुख क्षेत्रे, संस्कृती आणि लोकांमधील संबंध यासह विविध विषयांवर विचारविनिमय केला. त्यांनी प्रादेशिक आणि जागतिक हिताच्या मुद्द्यांवरही चर्चा केली. भारत आणि ओमान यांच्यातील राजनैतिक संबंधांना ७० वर्षे पूर्ण होणे हा द्विपक्षीय भागीदारीतील एक महत्त्वाचा टप्पा आहे, असे दोन्ही नेत्यांनी नमूद केले.

दोन्ही नेत्यांनी सर्वसमावेशक आर्थिक भागीदारी करारावर (CEPA) स्वाक्षरी झाल्याचे स्वागत केले आणि हा द्विपक्षीय संबंधांमधील एक महत्त्वाचा टप्पा असल्याचे म्हटले. यामुळे भारत-ओमान धोरणात्मक भागीदारी लक्षणीयरीत्या मजबूत होईल, असेही त्यांनी सांगितले.

## गोव्यामध्ये व्यावसायिक परवान्यांचे अविचारी वाटप; हायकोर्टाने अग्निकांडाची घेतली गंभीर दखल

● मुंबई, राकेश गायकवाड :





दोन आठवड्यांपूर्वी गोव्यातील बर्च बाय रोमियो लेन येथे लागलेल्या भीषण आगीच्या घटनेची उच्च न्यायालयाने गंभीर दखल घेतली आहे. अग्निकांडामुळे व्यावसायिक परवान्यांचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. गोव्यामध्ये व्यावसायिक परवान्यांचे अत्यंत अविचारीपणे वाटप केले जात आहे. याबाबत गोवा सरकारने गांभीर्याने भूमिका घेतली पाहिजे, असे निरीक्षण नोंदवत न्यायालयाने अग्निकांडाच्या पार्श्वभूमीवर याचिका दाखल करून घेतली.

न्यायमूर्ती सारंग कोतवाल आणि न्यायमूर्ती आशिष चव्हाण यांच्या खंडपीठासमोर एका खासगी जमिनीच्या वादाशी संबंधित याचिकेवर सुनावणी सुरू होती. यावेळी खंडपीठाने गोव्यातील अग्निकांडाचा उल्लेख करून तेथील परवान्यांच्या वाटपाबाबत चिंता व्यक्त करत काही वेळा स्थानिक कायदे अंमलात आणले जात नसल्याचे न्यायालय म्हणाले.

दरम्यान, नाइट क्लबमधील आग प्रकरणातील मुख्य आरोपी सौरभ लुथरा आणि गौरव लुथरा यांना मंगळवारी थायलंडमधून दिल्लीला आणण्यात आले आहे. दिल्ली विमानतळावर गोवा पोलिसांच्या एका पथकाने दोघांना विमानतळावरच अटक केली. सौरभ आणि गौरव लुथरा 'बिर्च नाइट क्लब'चे मालक आहेत. ६ डिसेंबर रोजी क्लबला आग लागली, त्यामध्ये २५ लोकांचा मृत्यू झाला होता. घटनेनंतर दोन्ही भाऊ थायलंडला पळून गेले होते.

थायलंड पोलिसांनी ११ डिसेंबर रोजी फुकेतमध्ये दोन्ही भावांना ताब्यात घेतले. मंगळवारी सकाळी त्यांना बँकॉकहून भारतात पाठवण्यात आले.

दोघांवर सदोष मनुष्यवध आणि निष्काळजीपणाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## केंद्रीय मंत्री गडकरींना रस्ते बांधणीचा 'विक्रम' करण्यास न्यायालयाची मदत

● नागपूर, नितीन देवळेकर :



केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत रस्ते, उड्डाणपूल आणि भुयारी मार्ग (टनेल) उभारले आहेत. दुर्गम भागात रस्ते बांधणी, डबल डेकर उड्डाणपूल उभारणी तसेच वेगवान रस्ते बांधणीचे अनेक विक्रम त्यांच्या नावावर आहेत. मात्र, काही ठिकाणी अतिशय संथ गतीने काम झाले असून अवघ्या दोन किलोमीटर रस्ता बांधण्यासाठी तब्बल १२ वर्षे लागल्याचे उदाहरणही त्यांनी दिले. देशभरात रस्ते बांधणीचे विक्रम आपल्या नावावर असल्याचे सांगत गडकरी यांनी नागपूरमधील काही प्रकल्पांच्या संथ गतीवर उपरोधिक भाष्य केले. नागपुरातील महाल परिसरातील केळीबाग रोड हा केवळ दोन किलोमीटरचा असून, या रस्त्याच्या बांधकामाला १२ वर्षे लागली. हा 'विक्रम' आपल्या निवासस्थानाजवळील रस्त्यामुळे झाल्याचे त्यांनी नमूद केले. हा विक्रम करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, नागपूर महापालिका आणि न्यायालयाचीही 'मदत' झाली, असा टोला त्यांनी लगावला.

आरबीआय चौक ते ऑटोमोटीव्ह चौकदरम्यानच्या सिमेंट कॉंक्रीट रस्त्यांच्या कामाचे भूमिपूजन सोमवारी केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते झाले.

यावेळी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले, महापालिका आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांच्यासह अनेक अधिकारी व नागरिक उपस्थित होते. यावेळी ते बोलत होते.माझ्या घरासमोरील (नागपूर) रस्त्यांचाही एक वेगळाच विक्रम आहे, असे सांगत त्यांनी महाल परिसरातील केळीबाग रोड या अवघ्या दोन किलोमीटर रस्त्यासाठी तब्बल १२ वर्षे लागल्याचा दाखला दिला. हा रस्ता बांधण्यासाठी अतिक्रमण हटवणे आवश्यक होते.

## चोरांची आंतरराज्य टोळी; तीन राज्य पालथे घालून पोलीस पोहोचले थेट...

● धुळे, सचिन कदम :



तालुका पोलिसांनी आंतरराज्यीय घरफोडी करणाऱ्या टोळीविरुद्ध प्रभावी कारवाई करत मोठे यश मिळविले आहे. गेल्या दोन महिन्यांपासून ग्रामीण भागात सातत्याने घरफोडीचे प्रकार करणाऱ्या या टोळीला अटक करून पोलिसांनी एकूण सहा गुन्ह्यांची उकल केली असून सुमारे १५ लाख ६० हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार २४ नोव्हेंबर २०२५ रोजी सायंकाळी ७.३० ते २५ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी अकरा वाजेच्या दरम्यान कुसुंबा (ता. धुळे) येथील वसंतराव राजाराम चव्हाण यांच्या घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी सुमारे चार लाख ७८ हजार रुपये किमतीचे सोने-चांदीचे दागिने व रोख रक्कम चोरून नेली होती.

यानंतर कुसुंबा, नेर, मोराणे, कुंडाणे व अकलाड या गावांमध्येही घरफोडीचे प्रकार घडल्याची नोंद धुळे तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. या घटनांचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस निरीक्षक धनंजय पाटील यांच्या नेतृत्वाखाली तपास पथक तयार करण्यात आले.

पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे व अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे यांच्या मार्गदर्शनाखाली पारंपरिक तपास पद्धतींसह आधुनिक तांत्रिक विश्लेषणाचा वापर करण्यात आला. तपास पथकाने परिसरातील तसेच तीन राज्यांतील सुमारे ३७५ एएनपीआर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची तपासणी करून संशयितांच्या हालचालींचा माग काढला.

## म्हाडाच्या जमिनीवर अतिक्रमण; शिवसेनेचे आमदार मंगेश कुडाळकर अडचणीत; गुन्हा दाखल करण्याचे कोर्टाचे आदेश

● मुंबई, दिगंबर जाधव :




शिवसेना शिंदे गटाचे आमदार मंगेश कुडाळकर यांच्या अडचणीत भर पडली आहे. कुडाळकर यांनी सार्वजनिक सुविधांसाठी राखीव असलेल्या म्हाडाच्या जमिनीवर अतिक्रमण केल्याचा तसेच सार्वजनिक निधीचा गैरवापर केल्याचा आरोप आहे. संबंधित आरोपांची सखोल चौकशी करण्याचे आणि गुन्हे दाखल करण्याचे आदेश भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत विशेष न्यायालयाने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाला (एसीबी) दिले आहेत. न्यायालयाचा हा आदेश कुडाळकर यांच्यासाठी मोठा झटका मानला जात आहे.

कुडाळकर यांच्यावर आरोप करीत स्थानिकरहिवासीरमेशसत्यानबोरवायांनी तक्रार दाखल केली आहे. त्या तक्रारीची दखल घेत मुंबई सत्र न्यायालयातील विशेष न्यायाधीश सत्यनारायण आर. नावंदर यांनी सखोल चौकशीचे आदेश दिले आहेत. तक्रारदाराने कुर्ला (पूर्व) येथील सुविधा सेवा आणि उद्यानासाठी राखीव असलेल्या भूखंडावर तीन वेळा आमदार राहिलेल्या मंगेश कुडाळकर यांनी अनधिकृतपणे एक हॉल आणि अनेक व्यावसायिक प्रतिष्ठाने बांधल्याचा आरोप केला आहे. या आरोपासंदर्भात तक्रारदाराने प्रतिज्ञापत्रासह पुरावे म्हणून अनेक कागदपत्रे सादर केली आहेत. आरोपांच्या कागदपत्रांची तसेच म्हाडाने दिलेल्या पत्रव्यवहारासह सादर केलेल्या इतर साहित्याची तपासणी केल्यानंतर न्यायालयाने मंगेश कुडाळकर यांच्या सखोल चौकशीचे आणि गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले आहेत.

प्रथमदर्शनी म्हाडाने सुविधा सेवा आणि उद्यानासाठी राखीव ठेवलेल्या भूखंडावर काही व्यावसायिक केंद्रांसह अनधिकृतपणे हॉल बांधला गेल्याचे उघड होत आहे, असे निरीक्षण विशेष न्यायाधीशांनी चौकशीचा आदेश देताना नोंदवले आहे. तक्रारदाराने केलेल्या आरोपांमध्ये तथ्य आहे. त्या आधारे पोलिसांनी सखोल चौकशी करण्याइतपत पुरावे निदर्शनास येत असल्याचेही न्यायालयाने म्हटले आहे. त्यामुळे कुडाळकर यांच्या अडचणीत मोठी वाढ झाली आहे.

## जुन्नरच्या कन्येची 'गगनभरारी'!; 'समृद्धी'ची भारतीय वायुदलात फ्लाईंग ऑफिसर पदावर नियुक्ती

● पुणे, शकील शेख :



असं म्हणतात, मेहनत केल्याने अशक्य गोष्टही शक्य करता येते आणि याची प्रचिती ही आपल्याला विविध प्रयत्नातून समोर येतच असते. अशीच मेहनत, जिद्द आणि चिकाटीने लहान वयापासून भारतीय वायुदलाचे स्वप्न पाहणारी पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यातील खोडद गावची सुकन्या समृद्धी वामन हिची भारतीय वायुदलात फ्लाईंग ऑफिसर या पदावर नियुक्ती झाली असून, तिची नियुक्ती झाल्यानंतर सर्वत्र तिचं कौतुक होताना पाहायला मिळतंय.

**नातेवाईकांनी तिचे अभिनंदन करत केलं स्वागत :** जुन्नर तालुक्यातील खोडद गावची सुकन्या समृद्धी अरुणा अजित वामन हिची भारतीय वायुदलात फ्लाईंग ऑफिसर या पदावर नियुक्ती झाल्यानंतर तिच्या गावात गावकरी आणि नातेवाईकांनी तिचे अभिनंदन करत स्वागत केलंय. खोडदचे गडाचीवाडी हे समृद्धीचे गाव असून, नारायणगडाच्या पायथ्याशी तिचं घर आहे. आई मुंबई पोलीस दलात काम करीत असून, समृद्धीने इंजिनीअरिंगची डिग्री घेतली आणि त्यानंतर लहानपणापासून हवाई दलाचे आकर्षण असलेल्या वायुदलाची परीक्षा समृद्धीनं दिली आणि भारतीय वायुदलात फ्लाईंग ऑफिसर या पदावर आता तिची नियुक्ती झाली आहे.

**स्वप्न पूर्ण करण्यासाठी तिला अनेकांनी मदत केली :** याबाबत समृद्धी म्हणाली की, मी लहानपणापासूनच भारतीय वायुदलात जाण्याचं स्वप्न पाहिलं होतं आणि हे स्वप्न पूर्ण करण्यासाठी मला अनेकांनी मदत केली. कुठेही क्लास न लावता युट्यूबची मदत घेत लेखी परीक्षा दिली आणि ती परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर माझा इंटरव्ह्यू होता आणि तोसुद्धा क्लिअर करून आज माजी भारतीय वायुदलात फ्लाईंग ऑफिसर या पदावर नियुक्ती झाली आहे.आता माझी दुनदिगल येथे ट्रेनिंग होणार आहे. प्रत्येकाने स्वप्न बघून ते स्वप्न पूर्ण करण्यासाठी मेहनत घेतली पाहिजे, नक्कीच मेहनत केल्याने आपली स्वप्नं पूर्ण होतात, असं यावेळी तिनं सांगितलय.

**तिच्या मामाने खूप जास्त मेहनत घेतली :** यावेळी समृद्धीची आई अरुणा वामन यांनी सांगितलं की, समृद्धी हिने जी स्वप्न पाहिली होती ती पूर्ण करण्यासाठी तिने खूप जास्त मेहनत घेतली आहे. या मेहनतीमध्ये तिच्या मामाने खूप जास्त मेहनत घेतली. तिला वेळोवेळी मार्गदर्शन तसेच जे काही पाहिजे ते तत्काळ उपलब्ध करून दिलंय.